सांध्य दैनिक
# विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026
❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ६० वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. २५ मार्च २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## दिशा सालियन प्रकरण : आदित्य ठाकरे ड्रग्जच्या बिझनेसमध्ये, उद्धव ठाकरेही आरोपी

### वकील निलेश ओझा यांचे खळबळजनक आरोप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

दिशा सालियनचा मृत्यू अपघाती नसून तिच्यावर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आल्याचा गंभीर आरोप करत वडिल सतिश सालियन यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. तसेच, याप्रकरणाची पुन्हा चौकशी करण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी याचिकेतून केली आहे. त्याच अनुषंगाने आज दिशा सालियनचे वडिल सतिश सालियन यांच्यासह या प्रकरणात सतिश सालियन यांची बाजू मांडणरे वकील निलेश ओझा यांनी आज मुंबईत पोलीस आयुक्तालयात जाऊन वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधताना पुन्हा एकदा शिवसेना उबाठा पक्षाचे नेते व आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह त्यांचे वडिल उद्धव ठाकरेंवर गंभीर आरोप केले आहेत.

दिशा सालियन प्रकरणात निलेश ओझा यांनी आमदार आदित्य ठाकरे यांच्यासह अभिनेता दिनो मोरिया, सूरज पांचोली आणि माजी पोलीस अधिकारी परमबीर सिंग यांच्यावरही गंभीर आरोप केले आहेत. वकील निलेश ओझा यांनी माध्यमांशी बोलताना म्हटले की, नार्कोटिक्स ब्युरोच्या तपासात हे आढळून आलंय आदित्य ठाकरे हे ड्रग्स बिझनेसमध्ये सहभागी आहेत. त्यासंदर्भाती इतंभू माहिती आम्ही या अर्जात दिली आहे. आदित्य ठाकरे, दिनो मोरिया यांच्या फोन कॉल्ससह समीर खान नावाच्या व्यक्तीची डीएफीपी नावाची कंपनी होती,जी ड्रग्सचे सिंडिकेट चालवत होती.

आदित्य ठाकरे यांचं नाव ड्रग्सच्या बिझनेसमध्ये आल्यानंतर समीर वानखेडे असो किंवा नार्कोटेक्स ब्युरोचे इतर अधिकारी असतील, त्यांना आदित्य ठाकरेंवर कारवाई करण्यासाठी कोणी थांबवलं, असा सवाल ओझा यांनी विचारला आहे. त्यामध्ये, किती कोटींची डील झाली असाही सवाल ओझा यांनी विचारला. पोलिस आयुक्तालयात आमची जॉईंट सेक्रेटरी यांच्यासोबत चर्चा झाली, त्यानंतर त्यांनी पोलीस आयुक्तांशी फोनवरुन चर्चा करुन संबंधित प्रकरणात ही तक्रार दाखल करुन घेत असल्याचे म्हटले. त्यानुसार, आता एफआयआर दाखल झाल्याचेही ओझा यांनी सांगितले. आमच्या तक्रारीत आदित्य ठाकरे आणि उद्धव ठाकरे दोघेही आरोपी आहेत, अशी माहिती निलेश ओझा यांनी दिली.

**सतिश सालियन यांचं यापूर्वीच स्टेटमेंट रेकॉर्ड**

११ डिसेंबर २०२३ साली सतिश सालियन यांचं स्टेटमेंट रेकॉर्ड करण्यात आलंय. त्यामध्ये, त्यांनी केस रिओपन करुन चालवण्याची मागणी केली आहे. याशिवाय आमच्याकडे आय विटनेसही आहेत. दिशाची हत्या झाली त्या दिवशी आदित्य ठाकरे तिथं होते की नाही? आणि दुसरं म्हणजे दिशाचा मृत्यू हा नैसर्गिक नाही. त्यामुळे, ही आरोपीची जबाबदारी आहे की, त्यांनी ते पटवून द्यावं हा मृत्यू नैसर्गिक नाही, असे नितीन ओझा यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले.

## ईदचं औचित्य साधत भाजपा ३२ लाख मुस्लीम कुटुंबाला देणार 'सौगात ए मोदी' भेट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नवी दिल्ली**

ईदच्या निमित्ताने भाजपामुस्लीम समाजाला विशेष गिफ्ट देणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात भाजपा अल्पसंख्याक मोर्चा देशातील ३२ लाख गरीब मुसलमानांना ईदसाठी 'सौगात ए मोदी' किट देणार आहे. जेणेकरून ईद साजरी करण्यासाठी त्यांना कुठलीही अडचण होऊ नये. ईदसाठी हे गिफ्ट गरजू मुस्लिमांसाठी वाटप केले जाईल. अल्पसंख्याक मोर्चाचे ३२ हजार पदाधिकारी देशातील ३ हजार मशिदींमध्ये जाणार आहेत. त्याठिकाणी ३२ लाख गरजू मुस्लीम व्यक्तींना मदत केली जाणार आहे.



भाजपाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या मार्गदर्शनात मंगळवारी दिल्लीच्या निजामुद्दीन इथून या अभियानाची सुरुवात करण्यात आली. गरीब मुस्लीम कुटुंबाला ईद साजरी करण्यासाठी बऱ्याच अडचणींना सामोरे जावे लागते. या अभियानातंर्गत भाजपा गरजवंत मुस्लीम समाजापर्यंत पोहचणार आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात गरीब, गरजू शेजारी यांना मदत करण्यावर भाजपाने जोर दिला आहे. अल्पसंख्याक मोर्चा गुड फ्रायडे, ईस्टर, भारतीय नववर्षात सहभाग घेत सौगात ए मोदी किट वितरीत करेल. त्यामुळे सांप्रदायिक सलोखा वाढवण्यास मदत होईल असं भाजपा अल्पसंख्याक मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष जमाल सिद्दीकी यांनी सांगितले.

भाजपाने 'सौगात ए मोदी' अभियानाची घोषणा केली. या किटमध्ये खाण्या पिण्याच्या गोष्टींसोबत कपडे, शेवई, खजूर, ड्राय फ्रुट्स आणि साखर असेल. महिलांसाठी या किटमध्ये सूटचे कपडे असतील. पुरुषांसाठी किटमध्ये कुर्ता पायजमा असणार आहे. या प्रत्येक किटची किंमत ५०० ते ६०० रूपये इतकी आहे. गरीब आणि गरजू मुसलमानांना ईद साजरी करता यावी यासाठी भाजपा हा उपक्रम राबवत आहे.

दरम्यान, भाजपाकडून जिल्हास्तरावर ईद मिलनाचा कार्यक्रम आयोजित केला जाईल.

## शिवसेनेला मुख्यमंत्रिपदाची ऑफर, पण ४ जागांमुळे युती तुटली; देवेंद्र फडणवीसांचा गौप्यस्फोट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**




मागील दशकभरात महाराष्ट्राच्या राजकारणात अनेक मोठ्या घडामोडी घडल्या. दोन दशकांहून अधिक काळ सोबती असलेल्या भाजप आणि शिवसेना या पक्षांची युती तुटली आणि नवी समीकरणे राज्याच्या राजकारणात उदयास आली. युती कशामुळे तुटली याबाबत दोन्ही बाजूचे नेते अनेकदा दावे-प्रतिदावे करत असतात. अशातच भाजप नेते आणि राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल गौप्यस्फोट करत केवळ चार जागांच्या वादामुळे युती तुटल्याचा दावा केला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, २०१४ साली आमचा तेव्हाचा मित्रपक्ष असलेल्या शिवसेनेसोबत चर्चा सुरू होती. आम्ही त्यांना आमच्यापेक्षा जास्त जागा देण्यासही तयार झालो होतो. पण त्यांनी मनात एक आकडा ठरवला होता. आम्ही त्यांना १४७ जागा द्यायला तयार झालो होतो, आम्ही १२७ जागा लढवणार होतो आणि इतर जागा अन्य मित्रपक्षांना द्यायच्या होत्या. पण ते १५१ जागांवर अडून राहिले. त्यानंतर आम्ही ठरवलं की, १४७-१२७ हा फॉर्म्युला मान्य असेल तरंच शिवसेनेसोबत युती करायची. हा फॉर्म्युला मान्य असेल तर आम्ही तुमच्यासोबत आहोत, अन्यथा युती होऊ शकणार नाही, असा अल्टीमेटम आम्ही शिवसेनेला दिला होता. तुमचा मुख्यमंत्री आणि आमचा उपमुख्यमंत्री होईल, असंही सांगितलं होतं. पण विधात्याच्या मनात मला मुख्यमंत्री करण्याचं असेल. शिवसेनेनं सांगितलं की आमच्या युवराजांनी १५१ जागांची घोषणा केलीय. शिवसेना तेव्हा कौरवांच्या मूडमध्ये होती की आम्ही पाच गावेही देणार नाहीत. ते कौरवांच्या भूमिकेत गेल्यानंतर आम्हीही सांगितलं की आमच्याकडेही श्रीकृष्ण आहेत, आम्हीही लढाई लढू, असा दावा फडणवीस यांनी केला आहे. बिर्ला मातोश्री सभागृह येथे राजस्थान ग्लोबल फोरमच्या वतीने सिक्कीमचे राज्यपाल ओमप्रकाश माथुर यांच्या नागरी सत्कार कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते.दरम्यान, युती तोडण्याचा निर्णय घेण्यात येत होता तेव्हा निवडणुकीत यश मिळेल की नाही, याबाबत आमच्या पक्षात फक्त अमित शाह, ओमप्रकाश माथुर आणि मी अशा तिघांनाच आत्मविश्वास होता, असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

**फडणवीसांच्या दाव्यावर राऊत काय म्हणाले?**

देवेंद्र फडणवीस यांनी शिवसेना-भाजप युतीबाबत केलेल्या दाव्यावर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांनी म्हटलं आहे की, भाजपची शिवसेनेसोबतची युती तुटू नये, यासाठी देवेंद्र फडणवीस प्रयत्नशील होते. पण युती तोडावी, असे दिल्लीतून आदेश आले होते, असा दावा राऊत यांनी नाशिकमध्ये बोलताना केला आहे.

## शिवरायांचा अपमान करणाऱ्या प्रशांत कोरटकरला तीन दिवसांची पोलीस कोठडी : २८ मार्चपर्यंत सरकारी 'पाहुणचार'

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५कोल्हापूर**




इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना फोन करुन धमकावणे आणि छत्रपती शिवाजी महाराजांविषयी अपमानजनक टिप्पणी करण्याचा ठपका असलेल्या प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर जिल्हा न्यायालयाने तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. त्यामुळे प्रशांत कोरटकर याचा कोल्हापुरातील मुक्काम वाढला आहे. प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर पोलिसांच्या पथकाने सोमवारी दुपारी तेलंगणात अटक केली होती. त्याला घेऊन पोलीस पथक कालच कोल्हापूरच्या दिशेने रवाना झाले होते. हे पथक कोरटकरला घेऊन मंगळवारी सकाळी कोल्हापूरच्या जुना राजवाडा पोलीस ठाण्यात पोहोचले होते. यानंतर दुपारी १२ च्या सुमारास प्रशांत कोरटकर याला कोल्हापूर जिल्हा न्यायालयात नेण्यात आले.

न्यायालयातील सुनावणीदरम्यान सरकारी वकिलांनी प्रशांत कोरटकर याच्या ७ दिवसांच्या पोलीस कोठडीची मागणी केली होती. त्याच्या आवाजाचे नमुने घ्यायचे असून त्याच्या चौकशीसाठी सात दिवसांची कोठडी हवी असल्याचे सरकारी वकिलांनी म्हटले होते. मात्र, जिल्हा न्यायालयाने प्रशांत कोरटकर याला तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. न्यायमूर्ती एस.एस. तट यांनी हा निर्णय दिला. त्यामुळे एरवी थाटात राहणाऱ्या प्रशांत कोरटकर याला आणखी तीन दिवस कोल्हापुरातील जुना राजवाडा पोलीस ठाण्यात काढावे लागणार आहेत. प्रशांत कोरटकर हा तब्बल गेल्या महिनाभरापासून फरार होता. कोल्हापूर पोलिसांची पथके त्याचा कसून शोध घेत होती. आता प्रशांत कोरटकर याची पोलीस कोठडी मिळाल्यामुळे चौकशीत तो काय बोलणार, याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत.

दरम्यान, प्रशांत कोरटकर याला पोलीस ठाण्यातून न्यायालयात नेताना आणि परत आणताना कोल्हापुरातील शिवप्रेमींनी प्रचंड गर्दी केली होती. शिवाजी महाराजांविषयी अपमानजक टिप्पणी करणाऱ्या कोरटकर याला धडा शिकवण्यासाठी अनेकांना कोल्हापुरी वहाणा आणल्या होत्या. या वहाणांनी प्रशांत कोरटकर याला बडवण्याचा बेत शिवप्रेमींनी आखला होता. मात्र, पोलीस ठाणे आणि न्यायालयाच्या आवारात कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात केल्यामुळे आंदोलकांना प्रशांत कोरटकरपर्यंत पोहोचता आला नाही. प्रशांत कोरटकर यांना सुनावणी झाल्यानंतर न्यायालयातून बाहेर आणत असताना एका व्यक्तीने त्यांच्यावर चप्पल फेकली. मात्र, पोलिसांनी तात्काळ या व्यक्तीला रोखत ताब्यात घेतले.

## त्याची माफी मागायची इच्छा नाही, पण तो बाहेर येईलच ना; शिवसेना नेत्याची कुणाल कामराला चेतावनी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५मुंबई**

विनोदी कलाकार कुणाल कामराने शिवसेनेचे तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर केलेल्या कवितेमुळे शिवसेनेचे नेते खूपच संतापलेले आहेत. आता महाराष्ट्र सरकारमधील तथा शिवेसेनेचे मंत्री गुलाबराव पाटील यांनी म्हटलं आहे की, आम्ही आमच्या पद्धतीने काम करु. कुणाल कामराने स्पष्ट केलंय की तो माफी मागणार नाही. रविवारी संतप्त शिवसैनिकांनी त्याच्या कॉमेडी क्लबची तोडफोड केली.

गुलाबराव पाटील पुढे म्हणाले की, जर त्याने माफी मागितली नाही तर आम्ही त्याला आमच्या शैलीत उत्तर देऊ. त्याने माफी मागण्यास नकार दिलाय, पण याचा अर्थ असा नाही की आम्ही त्याला सोडून देऊ. तुम्ही दाढीवाला, चष्मावाला, रिक्षावाला म्हणाल तर आम्ही ते सहन करणार नाही. जर त्याने माफी मागितली नाही तर तर तो नक्कीच कधीतरी बाहेर येईल, तो कुठे लपून बसणार आहे. सरकारची भूमिका काय असेल ते



मुख्यमंत्र्यांनी आधीच सांगितलं आहे. मात्र, शिवसेना स्वत:ची भूमिका मांडेल.

दरम्यान, कुणाल कामरा प्रकरणाबाबत बोलताना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, खरं म्हणजे आरोपांवर मी प्रतिक्रिया देतच नाही. अडीच वर्ष सातत्याने पहिल्या दिवसापासून सरकार स्थापन झाल्यापासून आरोपांच्या फैरी लोकं झाडत होते. आम्ही पक्ष चोरला, धनुष्यबाण चोरला वगैरे आरोप करुनही जनतेने जर आम्हाला मँडेट दिला असेल, तर तुम्ही गद्दार कोण आणि खुद्दार कोण हे समजून जा.एकनाथ शिंदे पुढे म्हणाले, अभिव्यक्ती स्वातंत्र्य वगैरे ठिक आहे, पण त्याचा गैरफायदा घेऊन बोलणार असाल तर हा एक प्रकारचा व्यभिचार, स्वैराचार आणि एकप्रकारे सुपारी घेऊन बोलण्याचं काम आहे. शिंदेंनी बीबीसी मराठीच्या एका कार्यक्रमात बोलताना असं म्हटलं आहे.

## विरोधकांना विरोधी पक्षात कसे काम करायचे याचे प्रशिक्षण द्यायला मी तयार, कारण...

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मुंबई**

'मूळातच मला असं वाटतं की, विरोधी पक्षाला त्यांच्या विरोधी पक्षाच्या भूमिकेत जावं लागेल', असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी विरोधकांना टोले लगावले. विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना अंतिम आठवडा प्रस्तावाच्या मसुद्यावरूनच मुख्यमंत्री फडणवीस यांनी विरोधकांना घेरले. अंतिम आठवडा प्रस्तावाला न्याय मिळाला नाही, असे म्हणत त्यांनी विरोधी पक्ष म्हणून कसं काम करायचं असतं, यांच्या प्रशिक्षणाची गरज असेल तर मी द्यायला तयार आहे, असा चिमटा फडणवीसांनी काढला.

त्यातील अर्ध्या विषयांवर कोणी बोललंच नाही. म्हणजे तुम्ही मजकुरात मांडलं, पण त्यातील अर्धे विषय कुणी मांडलेच नाहीत. म्हणजे हे तयार करणारे आणि मांडणारे यांच्यात काही संबंध आहे का? काही चर्चा झालीये का? सगळ्यात महत्त्वाचं काय आहे की, मी गृह विभागाच्या चर्चेला सविस्तर उत्तर दिले होते. पुन्हा गृह विभागाचे ते विषय आले आहेत. काही अडचण नाही. पण, त्यात नव्याने मांडणी पण काहीच नाही. तीच मांडणी झाली, असे फडणवीस म्हणाले.

आमच्या सुनील प्रभुंनी जी आकडेवारी मांडली, तीच नाना पटोलेंनी मांडली. ती आकडेवारी कशी चुकीची आहे, हे मी परवाच सांगितलं. ती आकडेवारी कशी वाचायची? महाराष्ट्र नंबर दोन

**मुख्यमंत्री फडणवीसांची फटकेबाजी**




वर नाहीये, आठ वर आहे. पण, तरीही तेच याठिकाणी मांडण्यात आलं, असे म्हणत फडणवीसांनी विरोधकांना टोला लगावला. मूळातच मला असं वाटतं की, विरोधी पक्षाला त्यांच्या विरोधी पक्षाच्या भूमिकेत जावं लागेल. आपल्याला अंतिम आठवडा प्रस्ताव ही एक अशी संधी असते, ज्याच्यामध्ये ज्या विषयांवर सविस्तर चर्चा होऊ शकली नाही, पण ते महत्त्वाचे विषय आहेत. असे विषय आपण अंतिम आठवडा प्रस्तावात आणतो. मांडण्यात येतात. चर्चा करतो. दुर्दैवाने फारसं तसं झालेलं दिसत नाही, असेही फडणवीस म्हणाले.

**भुजबळ आणि मुनगंटीवारांची मदत घेईल : फडणवीस**

खरं म्हणजे मी स्व-इच्छेने तयार आहे, जर विरोधी पक्षाला विरोधी पक्षात कसं काम करायचं, याचं प्रशिक्षण हवं असेल, तर मी त्यासंदर्भात पक्षाचा अभिनिवेश विसरून हे प्रशिक्षण द्यायला तयार आहे. आणि गरज पडली, तर भुजबळ आणि मुनगंटीवार यांचीही मदत मी घेईन. कारण शेवटी सक्षम विरोधी पक्ष असण, हे लोकशाहीमध्ये अत्यंत महत्त्वाचं आहे. आणि सक्षमता ही संख्येने ठरत नाही. भुजबळ साहेब एकटेच होते, पूर्ण सभागृह डोक्यावर घ्यायचे पण विषय योग्य घेऊन घ्यायचे. त्यामुळे मला असं वाटतं की, भास्करराव तुमच्यासारखा ज्येष्ठ सदस्य असताना अंतिम आठवडा प्रस्तावावर अन्याय झालेला दिसतो, असे मिश्कील भाष्य फडणवीसांनी उत्तराच्या सुरुवातीलाच केले.

## संपादकीय ......

# सीबीएसईचे स्वागत; पण नियोजन उत्तम हवे!

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, सीबीएसई, आयसीएसई बोर्ड अशा विविध स्वरूपात प्ले ग्रुप, नर्सरी, ज्युनिअर केजीपासून दहावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यात येत आहे. महाराष्ट्राच्या शहरी आणि ग्रामीण भागात सर्वाधिक शिक्षण हे महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातूनच देण्यात येत आहे. दहावीच्या बोर्ड परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थी संख्येवरून त्याचा अंदाज येतो. त्यांची संख्या व तुलनेने सीबीएसई, आयसीएसई बोर्डाची परीक्षा देणाऱ्या दहावीच्या विद्यार्थ्यांची संख्या पाहिल्यावर आपणास त्याचा अंदाज बांधणे शक्य होते. गरिबांपासून ते सर्वसामान्यांपर्यंतची मुले ही महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या माध्यमातूनच शिक्षण घेत असतात. समाजातील नवश्रीमतांचा वर्ग, मध्यम वर्गीय, उच्च उत्पन्न गटातील लोकं आपल्या पाल्यांना सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या माध्यमातून शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाच्या शाळेत विद्यार्थ्यांना शिक्षण देण्यास प्राधान्य देत असतात. शिक्षण हे शिक्षण असते. त्यात कोणत्याही प्रकारचा दुजाभाव करता येणार नाही; परंतु शिक्षण शिकविण्याची पद्धती, त्या शिक्षणाचा दर्जा पाहिल्यावर तफावत दिसून येते. ही तफावत दहावीचा निकाल लागल्यावर अकरावी प्रवेशापासून पाहावयास मिळते.महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून दहावी उत्तीर्ण झालेली मुले व सीबीएसई, आयसीएसई बोर्डाच्या माध्यमातून दहावी उत्तीर्ण झालेली मुले यांच्यातील आत्मविश्वास, वावरण्यातील सहजता, इंग्रजी भाषेवरील प्राबल्य या गोष्टींतील विरोधाभास ठळकपणे पाहावयास मिळतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातून दहावी उत्तीर्ण झालेल्या मुलांना कॉलेजातील वातावरणात समरस व्हायला सहा ते सात महिन्यांचा कालावधी जातो. ही अडचण सीबीएसई, आयसीएसई बोर्डातून उत्तीर्ण झालेल्या मुलांना जाणवत नाही. सीबीएसईकडे समाजातील पालकांचा कल वाढत आहे. आपले बाळ जन्माला आल्यावरच त्या मुलांना सीबीएसईच्या शाळेतच प्रवेश द्यायचा, ही खूणगाठ पालकांनी मनाशी बांधलेली असते. एक तर आधीच इंग्रजी माध्यमाच्या शाळांमध्ये मुलांना शिक्षण देण्याची पालकांची आग्रही भूमिका आणि त्या माध्यमातून शिक्षण देणे ही प्रतिष्ठेची बाब मानली जात असल्याने राज्यातील शहरी आणि ग्रामीण भागातील मराठी शाळांना गेल्या काही वर्षांपासून मोठ्या प्रमाणावर 'टाळे' लागत आहे. मराठी माध्यमातील शिक्षकांना गेल्या काही वर्षांपासून 'सरप्लस'च्या समस्येचा सामना करावा लागत आहे. सीबीएसई अभ्यासक्रम आता राज्यातील जिल्हा परिषदेसह इतर शासकीय शाळांमध्ये शिकविला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून २०२५-२०२६ मध्ये सीबीएसई अभ्यासक्रमाचा समावेश केला जाणार आहे. राज्यातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढावी म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे, अशी माहिती राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी विधान परिषदेमध्ये दिली.

राज्याच्या अभ्यासक्रम आराखड्याला शालेय शिक्षण विभागाशी संबंधित सुकाणू समितीने मान्यता देण्यात आली आहे. सीबीएसई अंतर्गत पाठ्यपुस्तके मराठीमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहेत. १ एप्रिलपासून सत्राची सुरुवात करण्यात येणार आहे. विधान भवनातील अधिवेशनादरम्यान राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी गुरुवारी (२० मार्च) विधान परिषदेमध्ये या संदर्भात घोषणा करतात काय आणि अवघ्या ११ दिवसांतच या सीबीएसई अभ्यासक्रमाच्या सत्राची सुरुवात होणार आहे. हा प्रकार म्हणजे 'पी हळद आणि हो गोरी' अशातला प्रकार आहे. राज्यातील जिल्हा परिषदेसह अन्य सरकारी शाळांतून सीबीएसई अभ्यासक्रमातून शिक्षण देण्याचा प्रयत्न नक्कीच स्तुत्य आहे. याची यापूर्वीच अंमलबजावणी होणे आवश्यक होते. घोषणा करून अवघ्या ११ दिवसांमध्ये अंमलबजावणी करणे हा सर्व प्रकार आकलनापलीकडचा आहे.

राज्यातील जिल्हा परिषद, महानगरपालिका व अन्य शासकीय प्राधिकरणाच्या शाळांमध्ये आधीच इंग्रजीची बोंब आहे. सीबीएसईच्या शाळांमधील शिक्षक वर्ग हा सुरुवातीपासूनच प्रशिक्षित असतो. त्या शिक्षकांचे इंग्रजी भाषेवर प्रभुत्व आहे. त्या शाळांमध्ये येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरचे वातावरण सुरुवातीपासून इंग्रजाळलेले असते. आई-वडिलांपैकी कोणा तरी एकाचे इंग्रजी चांगले असते. जिल्हा परिषद तसेच महापालिकेच्या शाळांमध्ये शिक्षकांपासून ते विद्यार्थ्यांच्या घरापर्यंत सर्वत्रच बोंब आहे. जिल्हा परिषद व महापालिकेच्या शाळांतील ठरावीक शिक्षकांचा अपवाद वगळता उर्वरित सर्वच शिक्षकांमध्येच इंग्रजीबाबत फारशी रुची व त्यावर प्राबल्य नसेल, तर ते मुलांना काय शिक्षण देणार? याचाही कोठेतरी विचार होणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषदेतील शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुले ही शेतकरी परिवारातील असतात. महापालिका शाळेतील मुले ही गरीब वर्गातील तसेच अत्यल्प उत्पन्न गटातील मुले असतात. शेतकऱ्यांना शेतातून व शहरातील कष्टकऱ्यांना पोटासाठी दिवसभर संघर्ष करण्यातून वेळ मिळत नाही. ते कोठे मुलांच्या सीबीएसई अभ्यासक्रमाबाबत जागरूकता दाखवणार, मुलांकडे कितपत सीबीएसईच्या अभ्यासक्रमाबाबत आस्थेवाईकपणे चौकशी करणार, याबाबतही प्रश्नचिन्हच आहे. याशिवाय सीबीएसईचा अभ्यासक्रम सुरू करावयाचा म्हटल्यावर सध्या सुरू असलेल्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांचे काय करायचे? पुस्तके छापणाऱ्या बालभारतीच्या आस्थापनेचे काय? त्या कर्मचाऱ्यांचे पुढे काय भवितव्य? जिल्हा परिषदेच्या तसेच महापालिकेच्या शिक्षकांची सीबीएसई अभ्यासक्रमाबाबत तयारी कधी करून घेणार? याबाबत अस्पष्टता कायम आहे. सीबीएसईच्या नियोजनाची गरज आहे. अनियोजनामुळे, ढिसाळ कारभारामुळे चांगल्या संकल्पनेला अपयश येऊ नये हेच यानिमित्ताने प्रकर्षाने जाणवत आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# साक्षर होण्याचे अधुरे स्वप्न पूर्ण ; असाक्षरतेचा कलंक पुसण्याचा संधीने सोने केले

## उल्लास साक्षरर्गत धामणगावांत कार्यक्रमांत ५६ केंद्र परिणाम मूल्यपन चाचणी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५धामणगाव रेल्वे-** केंद्र शासन पुरस्कृत उल्लास नवभारत साक्षरता कार्यक्रमांतर्गत असाक्षरांची नोंदणी करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली असून, आधारभूत साक्षरता व संख्याज्ञानमापन चाचणी रविवारला (ता.२३) ते १० ते ५५ वाजेलाईन लोकशाही ५६ वर्षे केंद्र शांतता चाचणी आली.

साक्षराचे हो अधुरे स्वप्न पूर्ण वक्षरते कलंक पुसण्याची 'सर्वांसाठी' उपक्रम या उपक्रमातून १५ वर्षे आणि त्या अतिरिक्त शिक्षणासाठी असा प्रयत्न सुरू आहे. शैक्षणिक वर्षभूत साक्षरता आणि ज्ञान मूल्यमापन चाचणी (एफएलएनटी) ही परीक्षा २३ मार्चच्या केंद्र शासनाच्या निर्देशानुसार आयोजित करण्यात आली होती.याभूत साक्षात प्रश्नपत्रिका ही पायाभूत व संख्याज्ञान याच्याशी संबंधित असून तीन भागांमध्ये विभागली एकूण १५० गुणांची जोड आहे. संख्या अनुक्रमे वाचन ५०, लेखन ५० गुण, संख्या ५० गुणांची गुणज्ञान परीक्षा आहे. परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी प्रत्येक भागासाठी ३३ टक्के (१७ गुण) अनिवार्य आहेत आणि एकूण १५० गुण ३३ टक्के (५१ गुण) अनिवार्य असतील. कोणत्याही एका भागाचे ३ टक्के कमी होण्याचे ३ टक्के जास्त गुण ५ वाढीचे गुण दर्शवतात. ५ पेक्षा जास्त ग्रेस गुण देत नाहीत. भोगावकर,गटसमन्वयक धीरज जवळकार,शिक्षणविस्तार अधिकारी जीजा,बाळासाहेब मुंदे,मोहन देशमुख,केंद्रप्रमुख जगदीशकुमार सिरसाट,कुमुद गडलिंग,प्रफुल्ल डाफ,ज्ञानेश्वर राठोड,शरद कुकडे,कलेश काबंबळे,षभवराव,ज्योती राऊळ,वैशाली लीलविरवेले,खोलकीरावले, गवते,हेमंत कोटंबकर,मनोज शिगणापूर,नगर प्रशासनाचे शिक्षण व्यवस्थापक उमेश गोंडीक यांनी केंद्रावर भेटी देवून पहा अधिकारी.

१५ वर्षे आणि त्याहून अधिक वयोगटातील निरक्षर व्यक्तींमध्ये पायाभूत साक्षरता (वाचन, लेखन) आणि संख्या विकसित करून असाक्षर व्यक्तींमध्ये सर्व जीवन कौशल्ये विकसित करावयाची आहेत. या कौशल्यांमध्ये साक्षरता, काय डिजिटल विशिष्ट साक्षरता, आपत्ती व्यवस्थापन कौशल्य, आरोग्याची काळजी व सुरक्षितता, बाल संगोपन आणि शिक्षण, कुटुंब कल्याण बाबींचा समावेश आहे.

# शेततळ्यात प्लास्टिक अस्तरीकरण करण्यास मिळतंय १ लाखाचे अनुदान; वाचा सविस्तर

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना ही अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करण्यासाठी आणि त्यांच्या जीवनमानात सुधारणा करण्यासाठी महत्त्वाची योजना आहे.

या योजनेचा मुख्य उद्देश शेतकऱ्यांच्या शेतीसाठी आवश्यक सिंचन सुविधांची निर्मिती करणे आहे. यामुळे शेतकऱ्यांना योग्य पाण्याची सुविधा मिळेल आणि त्यांच्या उत्पादनामध्ये वाढ होईल व ते आर्थिकदृष्ट्या सक्षम होतील.

या योजने अंतर्गत शेतकऱ्यांना विविध प्रकारच्या अनुदानांची सुविधा उपलब्ध आहे. यात शेततळ्याच्या प्लास्टिक अस्तरीकरणासाठी १ लाख रुपये अनुदान दिली जाते. या पॅकेज अंतर्गत शेततळ्याचे प्लास्टिक अस्तरीकरण करण्यात येते.

**पात्रता निकष**

१) लाभार्थी अनुसूचित जाती/नवबौद्ध शेतकरी असावा.

२) जात प्रमाणपत्र असावे.

३) नवीन विहीरचा लाभ घेण्यासाठी किमान ०.४० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे.

४) सामुहिक शेतजमीन किमान ०.४० हेक्टर धारण करणारे एकत्रित कुटुंब लाभ घेऊ शकते.

५) इतर घटकांसाठी किमान ०.२० हेक्टर शेतजमीन असणे आवश्यक आहे.

६) कमाल शेतजमीन मर्यादा ६.०० हेक्टर आहे.

७) सातबारा आणि ८-अ उतारा आवश्यक आहे.

८) आधार कार्ड आवश्यक आहे.

९) बँक खाते आधार कार्डाशी संलग्न असावे.

१०) स्व. कर्मवीर दादासाहेब गायकवाड सबलीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत जमीन वाटप झालेल्या शेतकऱ्यांना प्राधान्य.

११) वार्षिक उत्पन्न दीड लाखापेक्षा कमी असावे.

१२) उत्पन्नाचा दाखला तहसीलदारांकडून मिळवावा लागेल.

१३) ग्रामसभेची शिफारस आवश्यक आहे.

**अर्ज कसा करावा?**

- योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावा लागतो.

- वेबसाईट: र्हींींिः// ारहरवलीं.ारहरीरीहींर.सीं.ळप/ ऋीशी

- ऑनलाईन अर्ज भरल्यावर लाभार्थींची निवड लॉटरी पद्धतीने होते.


- सर्व आवश्यक कागदपत्रे अपलोड करणे आवश्यक आहे.

- जिल्हास्तरीय समितीकडून मंजूरी मिळाल्यानंतर लाभार्थ्यांना अनुदान मिळेल.









**आवश्यक कागदपत्रे**

१) सातबारा दाखला आणि ८-अ उतारा.

२) ६ ड उतारा (फेरफार)

३) जात प्रमाणपत्र.

४) तहसीलदारांकडील उत्पन्नाचा दाखला.

५) आधार कार्डाची छायांकित प्रत.

६) बँक पासबुकाची छायांकित प्रत.

**संपर्क** - अधिक माहितीसाठी आपल्या जवळील कृषी सहाय्यक, मंडल कृषी अधिकारी, तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधू शकता किंवा कृषी अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडेही संपर्क साधू शकता.




## पायी चालताना दिसतात कोलेस्टेरॉल वाढल्याचे हे संकेत, दुर्लक्ष करणं पडू शकतं महागात!

**दि.२५विदर्भ प्रजासत्ताक**




बॅड कोलेस्टेरॉल शरीरात वाढणं आज एक मोठी गंभीर समस्या बनली आहे. बॅड कोलेस्टेरॉल शरीरात वाढलं तर हार्ट अटॅक आणि स्ट्रोकचा धोका सगळ्यात जास्त वाढतो. कारण कोलेस्टेरॉल रक्तवाहिन्यांमध्ये जमा होऊन नसा ब्लॉक करतं. ज्यामुळे हार्टपर्यंत सुरळीत रक्त पुरवठा होत नाही. कोलेस्टेरॉल शरीरात वाढलं तर शरीरात वेगवेगळी लक्षणं दिसू लागतात. कोलेस्टेरॉल वाढल्याची काही लक्षणं तुम्हाला वॉक करतानाही बघायला मिळतात. ती लक्षणं काय हे जाणून घेऊया.

**वॉक करताना दिसणारी कोलेस्टेरॉलची लक्षणं**

**पायांमध्ये वेदना-** कोलेस्टेरॉल वाढल्याचं सुरूवातीचं लक्षण म्हणजे पायी चालताना किंवा वॉक करताना पाय दुखतात. नसांमध्ये कोलेस्टेरॉल जमा होत गेलं की, नसा लहान होत जातात आणि मांसपेशींना पुरेसं ऑक्सीजन मिळत नाही. त्यामुळे मांड्या, पोटऱ्या, कंबर पाय दुखतात आणि थकवा येतो. खासकरून चालताना आणि पायऱ्या चढताना ही लक्षणं दिसतात.

**कमजोर स्नायू-** कोलेस्टेरॉलमुळं रक्तवाहिन्या आकुंचन पावतात, त्यामुळे पायांचे स्नायू कमजोर होऊ शकतात. अशात चालताना, बॅलन्स ठेवताना किंवा जास्त वेळ उभं राहताना याची जाणीव होऊ शकते.

खालचे भाग थंड

कोलेस्टेरॉल वाढल्यानंतर ब्लड सर्कुलेशन योग्य पद्धतीनं होऊ शकत नाही. ज्यामुळे पाय इतर अवयवांच्या तुलनेत अधिक थंड असतात. हे खासकरून चालताना किंवा चालल्यानंतर होतं. रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यावर रक्तप्रवाह सुरळीत होत नाही. ज्यामुळे उष्णतेचा प्रसारही कमी होतो.

**सुन्नपणा-झिणझिण्या**

कोलेस्टेरॉल जमा होऊन धमण्या ब्लॉक होतात, तेव्हा अनेक गोष्टींमध्ये अडथळा निर्माण होतो. अशात पायांमध्ये झिणझिण्या किंवा सुन्नपणा जाणवतो. ज्यांना नेहमीच ही समस्या होते त्यांनी लगेच डॉक्टरांना भेटावं.

**रंगात बदल-** पायाचा रंग हलका किंवा जांबळा-निळा झाला असेल तर हा हाय कोलेस्टेरॉलचा संकेत आहे. त्वचेमध्ये ऑक्सीजन कमी पोहोचल्यानं ही समस्या होते.

**कोलेस्टेरॉल कसं कमी कराल?**

कोलेस्टेरॉल वाढलं आहे किंवा कंट्रोल आहे हे जाणून घेण्यासाठी नियमितपणे टेस्ट करा. तेलकट, भाजलेले, मसालेदार पदार्थ कमी खावेत. फळं, भाज्यांचा आहारात समावेश करा. नियमितपणे व्यायाम करा.

# रमजान ईद साठी पोलीस यंत्रणा सज्ज

## अफवेवर विश्वास ठेवू नका, सोशल मीडियावरील माहितीची खात्री करा - पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी





विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२५अमरावती** - चंद्रदर्शनानुसार ३१ मार्च रोजी रमजान ईद साजरी होत आहे. ही ईद शांततेत पार पडावी आणि कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरिता पोलिस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी सोमवारी कार्यालयात महापालिका उपायुक्त, दोन्ही पोलिस उपायुक्त, मौलवी, शांतता समिती सदस्य, महावितरण, अन्य विभागांच्या अधिकारी तथा ठाणेदारांची बैठक घेतली.

या बैठकीमध्ये रमजान ईद दरम्यान शहरात साफसफाई करावी, याबाबतमनपास निर्देश दिले. तसेच सण-उत्सव काळात शहरातील पाणी पुरवठा, पुरवठा खंडित होणार नाही, याबाबत महावितरण व मजीप्राला सुद्धा सुचित करण्यात आले. अफवेवर विश्वास ठेवू नये. सोशल मीडियावरील माहितीची खात्री करावी. त्याची माहिती पोलिसांना द्यावी. समाजात तेढ निर्माण करणारी पोस्ट व्हायरल करणाऱ्याची माहिती घेऊन पोलिसांना कळवावे, असे आवाहन सीपींनी केले. सोशल मीडियावरील पोस्टवर सायबर पोलिसांतर्फे करडी नजर राहील.

**तरुणांचे समुपदेशन**

पोलिसांकडून शहरातील शांतता भंग करणाऱ्या समाजकंटकांची माहिती संकलित करण्यात आली आहे. त्यांच्यासह कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर सुद्धा कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. उपस्थित सर्वांनी आपल्याकडील तरुणांचे समुपदेशन करून त्यांना योग्य सूचना दयाव्यात, असे निर्देश पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी उपस्थितांना दिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

मंगळवार दि. २५ मार्च २०२५ शहर/ग्रामिण


# मेळघाटातील आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाय योजना करणार-आरोग्य मंत्री प्रकाश आबीटकर

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** मेळघाटातील आरोग्यविषयक समस्या जाणून घेण्यासाठी दौरा करण्यात आला. त्यानुसार आज दुर्गम भागातील प्राथमिक आरोग्य केंद्र, ग्रामीण आरोग्य केंद्रांना भेटी देण्यात आल्या. या माध्यमातून नागरिकांच्या आरोग्यविषयक असलेल्या समस्या जाणून घेण्यात आल्या. येत्या काळात मेळघाटात आरोग्य सुविधा सुधारण्यासाठी उपाययोजना करण्यात येणार आहे, असे आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबीटकर यांनी सांगितले.मेळघाटातील आरोग्य यंत्रणांची पाहणी करण्यासाठी श्री. आबीटकर यांनी दौरा केला. आमदार केवलराम काळे, आरोग्य संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, तहसीलदार जीवन मोरनकर, गटविकास अधिकारी शिवशंकर भारसाकळे, सहायक संचालक भारती कुलवाल आदी यावेळी उपस्थित होते. मंत्री श्री. आबीटकर यांनी



मेळघाटात आरोग्य सुविधा पुरविण्यासाठी योग्य त्या उपाययोजना केल्या जातील. इतर ठिकाणी ज्या सुविधा नागरिकांना मिळतात तशाच सुविधा मेळघाटतही तयार करण्यावर भर देण्यात येईल. अचलपूर येथील ग्रामीण रुग्णालय या भागातील महत्त्वाचे असल्यामुळे या ठिकाणी सुविधा वाढविण्यात येतील. आरोग्य यंत्रणेने सकारात्मक राहून नागरिकांना सुविधा पुरवाव्यात, असे आवाहन केले.

दरम्यान मंत्री श्री. आबीटकर यांनी सकाळी हतरू प्राथमिक आरोग्य केंद्राला भेट दिली. केंद्रातील आंतररुग्ण कक्षातील रुग्णांकडून माहिती घेऊन संवाद साधला. तसेच प्रयोगशाळा, औषध भांडार आदींची पाहणी केली. यावेळी त्यांनी कार्यरत कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. केंद्रातील पाणी आणि विजेची समस्या तातडीने निकाली काढण्यात येईल. त्यामुळे याठिकाणी येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सेवा द्याव्यात, अशा सूचना दिल्या. चुरणी येथील ग्रामीण रुग्णालयात श्री. आबीटकर यांनी औषधी विभाग, आंतररुग्ण कक्ष, प्रसूतिगृह, शस्त्रक्रिया गृह, रक्तसाठा केंद्र, एक्स-रे केंद्राची पाहणी केली.

यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या आरोग्य यंत्रणांनी जाणून त्यानुसार सुधारणा करावी. रुग्णालयात प्रामुख्याने ग्रामीण आणि गरजू रुग्ण येत असल्याने त्याला दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्याचे निर्देशही त्यांनी दिले. हिरडा येथील अंगणवाडी केंद्राला त्यांनी भेट दिली. याठिकाणी ४७ बालके असून यातील एकही बालक कुपोषित नसल्याबद्दल कर्मचाऱ्यांचे कौतुक केले. तसेच येत्या काळात चांगले कार्य करावे. बालकांचे पोषण होण्यासाठी त्यांना आणि मातांना सकस आहार पुरविण्यात यावा, असे निर्देश दिले. यावेळी लाभार्थ्यांना गोल्डन कार्डचे वितरण करण्यात आले. बोरुगव्हाण येथील ग्रामपंचायत कार्यालयाला श्री. आबीटकर यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. प्रामुख्याने रस्ते आणि आरोग्य विषयक सुविधा पुरविण्यासाठी मदत करण्यात येईल, असे सांगितले. दौऱ्यादरम्यान श्री. आबीटकर यांनी नागरिक, संस्था आणि संघटना त्यांच्याकडून निवेदने आणि तक्रारी स्वीकारल्या.

# 'झेडपी'च्या अर्थसंकल्पात आरोग्य, कृषी, सिंचन, रोजगार व्यवस्थेवर भर



## प्रशासक संजीता महापात्र : २८ कोटींचे सुधारित, तर २९ कोटींच्या मूळ अंदाजपत्रकास मंजुरी



अर्थसंकल्पात दुर्धर, हृदयरोग रुग्णांसाठी, समाजकल्याण विभागामार्फत बेरोजगार, महिला व शेतकऱ्यांना नावीन्यपूर्ण वैयक्तिक लाभाच्या योजनांसह महत्त्वाच्या विभागांसाठी भरीव तरतूद केली आहे.

**संजीता महापात्र, सीईओ**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती –** जिल्ह्याचे मिनी मंत्रालय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सन २०२४-२५ चा २८ कोटी ६८ लाख ९१ हजार ६४९ रुपयांचे सुधारित, तर सन २०२५-२६ चे २९ कोटी ७२ लाख ८७ हजार ४० रुपयांचा मूळ अर्थसंकल्प जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक संजिता महापात्र यांनी सोमवारी खातेप्रमुखांच्या सभेत सादर करुन त्यावर शिक्कामोर्बत केले.जिल्हा परिषदेच्या डॉ. पंजाबराव देशमुख सभागृहात पार पडलेल्या अर्थसंकल्पीय सभेच्या अध्यक्षस्थानी सीईओ संजीता महापात्र होत्या. यावेळी मुख्य लेखा व वित्त अधिकारी डॉ. हेमंत ठाकरे, उपमुख्य कार्यकारी बालासाहेब बायस, संजय खारकर, विलास मरसाळे, बांधकामचे कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, जलसंधारण विभागाचे सुनील जाधव, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. पुरुषोत्तम सोळंके, कृषी विकास अधिकारी मल्ला तोडक, समाजकल्याण अधिकारी डी.एम.पुंड, शिक्षणाधिकारी अरविंद मोहोरे, लेखा अधिकारी मधुसूदन दुच्चके, संजय नेवारे आदी उपस्थित होते.

'झेडपी'च्या सन २०२४-२५ चा २८ कोटी ६८ लाख ९१ हजार ६४९ सुधारित, तर सन २०२५-२६ चे २९ कोटी ७२ लाख८७ हजार ४० रुपयांच्या मूळ अर्थसंकल्पाला मंजुरी दिली. यामध्ये यंदा आरोग्य, सिंचन, कृषी व नावीन्यपूर्ण योजनांवर भर देण्यात आला आहे. प्रशासक राजवटीतील हा तिसरा अर्थसंकल्प आहे.

### विभागनिहाय तरतूद

**२०२५-२६ (आकडे कोटी मध्ये)**

| | |
|---|---|
| समाजकल्याण | २.८१ |
| दिव्यांगाकरिता | ७५ लाख |
| महिला, बालकल्याण | १.४१ |
| कृषी | १.४७ |
| शिक्षण | ३.२३ |
| बांधकाम | ५.२५ |
| सिंचन | ३.८४ |
| आरोग्य | २.३१ |
| पाणीपुरवठा | २.५३ |
| पशुसंवर्धन | १.१४ |

# जिल्हा क्षयरोग रुग्णालयात क्षयरोग मुक्त रुग्णांचा गौरव, जनजागृती

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती :** जिल्हा क्षयरोग अधिकारीकार्यालय व गो. ग. राठी क्षयरोग रुग्णालयांच्या संयुक्त विद्यमानाने सोमवारी जागतिक क्षयरोग दिन साजरा करण्यात आला. सदरील कार्यक्रमात क्षयरोगावर मात करून क्षयरोग मुक्त झालेल्या रुग्णांना टी. बी. चॅम्पियन म्हणून सन्मानित करण्यात आले. तसेच त्यांचे अनुभव कथन मांडण्यात आले.

सदरील कार्यक्रमात समाजात क्षय रोग संबंधी जनजागृती, गैरसमज दुरीकरण संबंधी उपाय, टी. बी. संबंधित नवीन तपासणी तंत्रज्ञान, नवीन उपचार पद्धती याबद्दल तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानीरुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजय पवार, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अनिल रोहणकर व डॉ. सतीश डहाके हे होते. कार्यक्रमाला डॉ. अभिजित दिवेकर, डॉ. रुपाली कोरडे, डॉ. संदीप सुखसोहळे हे उपस्थिती होती. समाजात आता लोकांनी क्षयरोगाकडे सामाजिक कलंक म्हणून न बघता याकडे दुर्लक्ष ना करता, लक्षणे दिसताच लवकरात लवकर तपासणी करून उपचार करणे गरजेचे आहे, असे मत प्रमुख पाहुणे डॉ. अनिल रोहणकर यांनी मांडले. कार्यक्रमाचे संचालन डॉ. विशाल धांडे यांनी तर आभार प्रदर्शन पुरुषोत्तम खडसे यांनी मानले. कार्यक्रमासाठी कैलाश शिंदे, रवी गोसावी, दिलीप देशमुख परिश्रम घेतले.

# रविवारी बेलोरा विमानतळावर होणार 'टेस्ट राईड'इंदोर

## अमरावती विमानाव्दारे होणार परीक्षण चाचणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** अमरावती जिल्ह्याच्या विकासात मैलाचा दगड ठरू पाहणाऱ्या बेलोरा विमानतळ प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज झाले आहे. त्यानुसार राज्य शासनाने तयारी चालविली असून, रविवार, ३० मार्च रोजी विमानतळावर 'टेस्ट राइड' होणार आहे. इंदूर-अमरावती आणि अमरावती-इंदूर यादरम्यान एटीआर विमानाची परीक्षण चाचणी केली जाणार आहे. त्यानंतर विमानतळावर पुन्हा दोन तांत्रिक चाचण्या केल्या जातील, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली



आहे.साधारणतः एप्रिल महिन्यात अमरावती-मुंबई एटीआर ७२ विमानसेवा सुरू होईल, अशी तयारी भारतीय विमानतळ प्राधिकरणाने केली आहे.बेलोरा विमानतळाहून प्रवासी विमानसेवा सुरू व्हावी, यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सातत्याने प्रयत्नरत आहेत.गत काही दिवसांपूर्वी अमरावती विमानतळाला हवाई उड्डाणासाठी आवश्यक असलेला परवाना डीजीसीएकडून प्राप्त झाला आहे.त्यामुळे आता अमरावती विमानतळावरून हवाई उड्डाणाचा मार्ग सुकर झाला आहे. अलायन्स एअरचे अमरावती-मुंबई-अमरावती असे विमान एप्रिल महिन्यात उड्डाण करेल. डीजीसीएचे प्रमाणपत्र प्रातिनिधिक स्वरुपात एमएडीसीच्या एमडी स्वाती पांडे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सोपविले होते. आता अमरावती विमानतळाची परीक्षण चाचणी होत असून, ही चाचणी प्रवासी वाहतुकीसाठी अतिशय महत्त्वाची मानली जात आहे.

प्रवासी वाहतुकीसाठी सज्ज असलेल्या अमरावती विमानतळाची टेस्ट राइड रविवार, ३० मार्च रोजी होणार आहे. इंदूर-अमरावती विमान एटीआर ७२ अशी ही वैमानिक चाचणी आहे.त्यानंतर दोन ते तीन तांत्रिक चाचण्या झाल्यानंतर प्रत्यक्षात अमरावती-मुंबई प्रवासी वाहतूक विमानसेवा सुरू होईल. केंद्र सरकारकडे पत्रव्यवहार केला जात आहे.

**स्वाती पांडे,** व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी.

# ५० फूट खोल विहिरीत आढळला मृत बिबट

## जळका जगताप येथील घटना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५पोहरा बंदी :** चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्रातील जळका बीट नजीकच्या एका शेतातील ५० फूट खोल विहिरीत एक दीड वर्षीय नर बिबट मृत अवस्थेत आढळून आला. सोमवारी दुपारी १२ वाजताच्या सुमारास ही घटना उघडकीस आली. वनविभागाच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या मृत बिबट्याला बाहेर काढत त्याचे शवविच्छेदन करून त्याला भडाग्नी देत अंत्यसंस्कार केले.

जळका जगताप येथे शेतमालक दादाराव घाटोळ यांना त्यांच्या शेतात बिबट्या मृत अवस्थेत दिसून येताच त्यांनी तातडीने याची माहिती वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार यांना दिली. यावेळी त्यांनी चांदूर रेल्वे वर्तुळ अधिकारी अनीस शेख, वनरक्षक रमेश किरपाणे, रोहित



जुनघरे, शिव राठोड, वाहनचालक सुमित भुयार, अंकुश खेकाडे घटनास्थळ आदींनी गाठले. चांदूर रेल्वे आरएफओ भानुदास पवार यांनी घटनास्थळी पाहणी केली. बिबट विहिरीमध्ये मृतावस्थेत आढळून आला. वनविभागाच्या मदतीने या मृत बिबट्याला विहिरीतून बाहेर काढण्यात आले. अंदाजे दीड वर्षांचा नर बिबट शिकारीच्या शोधात भटकत असताना विहिरीत पडून पाण्यात बुडाल्याने मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त होत आहे. वन विभागाने मृत बिबट्याचा नोंदविला. पंचनामा यानंतर पशुवैद्यकीय अधिकारी आशिष कोल्हे यांनी बिबट्याचे शवविच्छेदन केले. बिबट हा अनुसूची १ मधील प्राणी आहे. यावेळी चांदूर रेल्वे वनपरिक्षेत्र अधिकारी भानुदास पवार, मानद वन्यजीव रक्षक जयंत वडतकर यांच्या उपस्थितीत मृत बिबटचाला भडाग्नी देण्यात आला.

# कैदी पॅरोलवर सुटला अन् पळालाही!

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५ अमरावती–** पॅरोलवर सुटलेला जन्मठेपेचा कैदी फरार झाल्याची घटना धामणगाव रेल्वे तालुक्यात उघड झाली. याप्रकरणी फरार बंदी भीमराव मारोती अवथरे (४३, रा. हिरपूर, ता. धामणगाव रेल्वे) याच्याविरुद्ध तळेगाव दशासर पोलिसांनी २३ मार्च रोजी रात्री गुन्हा दाखल केला. अमरावती कारागृहातील शिपाई मंगेश सोळंके यांनी तक्रार नोंदविली.



अवथरे याच्याविरूध्द सन २०१८ मध्ये खून, पुरावा नष्ट करणे व फौजदारी स्वरुपाचा कट रचणे अशा कलमान्वये गुन्हा दाखल होता. २० जानेवारी २०२० रोजी त्याला यवतमाळच्या जिल्हा सत्र न्यायालय तथा अतिरिक्त सत्र न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली होती. त्याला ती शिक्षा भोगण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती कारागृहात पाठविण्यात आले होते. दरम्यान, बंदी भीमराव याने कारागृह प्रशासनाकडे आपल्याला एक दिवसाच्या अभिवचन रजेवर सोडण्यात यावे, असा अर्ज प्रशासनाकडे केला होता. त्यानुसार तो २१ मार्च रोजी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात परतणे गरजेच होत.

# विमानतळावर आजपासून एका पीआयसह २५ पोलिसांची सुरक्षा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** बेलोरा विमानतळावरून लवकरच प्रवासी विमानसेवा सुरू होणार असल्याचे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केले. दरम्यान त्या दृष्टीने तयारी सुरू झाली आहे. विमानतळ परिसरात सुरक्षेसाठी पोलिस अधीक्षकांनी एका पोलिस निरीक्षकांसह २४ अंमलदारांची नियुक्ती केली आहे. त्यामुळे मंगळवार, २५ मार्चपासून बेलोरा विमानतळ परिसरात पोलिस चोवीस तास सुरक्षेसाठी तैनात राहणार आहेत.




पोलिस निरीक्षक संतोष डाबेराव यांच्यासह १० पोलिस जमादार आणि १४ पोलिस शिपाई अशी एकूण २५ पोलिस अधिकारी, अंमलदारांची नियुक्ती विमानतळाच्या सुरक्षेसाठी करण्यात आली आहे. यामध्ये १० महिला पोलिसांचाही समावेश आहे. हे पोलिस पथक आठ तासांची एक याप्रमाणे तीन पाळीमध्ये चोवीस तास विमानतळाची सुरक्षा व्यवस्था सांभाळणार आहे, अशी माहिती पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांनी दिली. आता पूर्णवेळ सुरक्षा तैनात झाल्यामुळे अमरावती विमानतळावरून लवकरच प्रवासी विमान वाहतूक सुरू होणार असल्याचे दिसत आहे.

# १२ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया सुरू , २७ एप्रिलला मतदान

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती–** अमरावती जिल्ह्यातील १२ सहकारी संस्थांची निवडणूक प्रक्रिया २३ मार्चपासून सुरू झालेली आहे.



यामध्ये १० सेवा सहकारी सोसायटींसह दोन पतसंस्थांचा समावेश आहे. या संस्थांसाठी २७ एप्रिल रोजी मतदान होणार आहे. प्राधिकरणाचे निर्देशानुसार जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक शंकर कुंभार यांचे निर्देशानुसार मतदार यादीची प्रसिद्धी झालेल्या सहकारी संस्थांमध्ये २४ मार्चपासून उमेदवारी अर्जाची प्रक्रिया सुरू झालेली आहे. यामध्ये फक्तअष्टविनायक पतसंस्था बेनोडा (शहीद)या संस्थेसाठी २७ एप्रिल मतदान झाल्यानंतर २८ एप्रिल रोजी मतमोजणी होणार आहे. उमेदवारी अर्ज २४ ते २८ मार्च, छाननी १ एप्रिल, माघार २ ते १६ एप्रिल, चिन्ह वाटप १७ एप्रिल, मतदान २७ एप्रिल, मतमोजणी मतदानानंतर लगेच होणार आहे.

### या संस्थांची निवडणूक

सेवा सहकारी सोसायटी दर्यापूर, बेंबळा, जामगाव, राजूरा, ब्राम्हणवाडा थडी, खानापूर (मेंढी) बोराळा, मूर्तिजापूर, मोझरी व मसदी, याशिवाय जागृत नवयुवक शिक्षण संस्था कर्मचारी सहकारी पतसंस्था व भूमी अभिलेख कर्मचारी सहकारी पतसंस्थेची निवडणूक सध्या प्रक्रियेत आहे.

# मध्यरात्री राज्याच्या आरोग्यमंत्र्यांचा सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे धडक दौरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती,-** स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय, अमरावती येथे आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी भेट दिली. सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल येथे रात्री १२.३० ला रुग्णालयात अचानक भेट देऊन रुग्णालयातील वॉर्डमध्ये राऊंड घेऊन सखोल आढावा घेतला. अधिकाऱ्यांची चौकशी करून आतापर्यंत झालेल्या एकूण शस्त्रक्रिया याविषयी माहिती घेतली. बाह्यरुग्ण विभाग तसेच आंतररुग्ण विभागामध्ये सद्यस्थितीत ३२१ भरती असलेल्या रुग्णांची स्थिती जाणून घेतली. आतापर्यंत झालेले ५१ यशस्वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेबाबत अधिकारी, डॉक्टर्स व त्यांच्या चमूचे कौतुक केले.



तसेच किडनी प्रत्यारोपण खउण व छखउण ला प्रत्यक्ष भेट दिली. त्याचप्रमाणे अपुऱ्या असलेल्या यंत्रसामुग्री विषयीची दखल घेतली. यावेळी आरोग्यमंत्री श्री. आबिटकर यांच्या समक्ष रुग्णालयातील टप्पा ३ बद्दल प्रस्ताव मांडण्यात आला. ज्यामध्ये लिव्हर प्रत्यारोपण, गुडघे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट इत्यादी आजारांवर उपचार करण्यात येतील. आरोग्यमंत्र्यांनी रुग्णालयातील अधिकारी, डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या कामगिरीबद्दल त्यांचे कौतुक केले.

तसेच तांत्रिक अडचणी सोडविण्याचा प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. आरोग्य सेवा संचालक डॉ. नितीन अंबाडेकर, उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी, जिल्हा शैल्य चिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे, विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे, नोडल ऑफिसर डॉ. निलेश पाचबुद्धे, डॉ. श्याम गावंडे, डॉ. माधव ढोपरे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. विनोद पवार, डॉ. अरुण सोळंके आदी उपस्थित होते.

# नागपूर हिंसाचाराचे आरोपी देशाचे नागरिक नाहीत का?

## उच्च न्यायालयाचा परखड सवाल

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५नागपूर :-** उपराजधानीमधील धार्मिक हिंसाचाराचा कथित सूत्रधार फहीम खान शमीम खान व आरोपी अब्दुल हफीज शेख लाल यांच्या घरांवरील बुलडोझर कारवाई प्रथमदृष्ट्या अवैध आढळून आल्यामुळे नागपूर खंडपीठाने सोमवारी तीव्र नाराजी व्यक्त करून महापालिकेला कडक शब्दांत फटकारले. हिंसाचारातील आरोपी देशाचे नागरिक नाहीत का, त्यांची घरे पाडताना कायद्याचे पालन करण्याची गरज नाही का, असे परखड प्रश्न करून बुलडोझर कारवाईला अंतरिम स्थगिती दिली, तसेच पालिका आयुक्तांना नोटीस बजावून कारवाईवरील आक्षेपांवर १५ एप्रिलपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. बुलडोझर कारवाईविरुद्ध फहीम खानची आई जेहरुनिस्सा शमीम खान व अब्दुल हफीजचा मुलगा मो. अयाज अब्दुल हफीज शेख यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. चिखलीमधील संजयबाग कॉलनी येथील फहीम खानचे घर न्यायालयाच्या स्थगितीपूर्वीच पाडण्याची कारवाई पालिकेने पूर्ण केली. महालमधील अब्दुल हफीजच्या घराचा काही भाग पाडण्यात आला. उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर कारवाई लगेच थांबविण्यात आली.



### सरकारची भूमिका काय?

सर्वोच्च न्यायालयाच्या १३ नोव्हेंबर २०२४ रोजीच्या निर्णयाची राज्यात काटेकोर अंमलबजावणी होणे आवश्यक आहे, असे नमूद करून मुख्य सचिवांना पुढच्या सुनावणीपर्यंत भूमिका स्पष्ट करण्याचा आदेश न्यायालयाने दिला.

दंगल व जाळपोळीच्या घटनेचा कथित सूत्रधार फहीम खान शमीम खानच्या घरावर अखेर नागपूर महानगरपालिका प्रशासनाचा 'यूपी स्टाईल' बुलडोझर चालला. संजयबाग कॉलनीतील फहीमच्या घरावर पोलिसांच्या कडेकोट बंदोबस्तात बुलडोझर चालविण्यात आला व अनधिकृत बांधकाम पाडण्यात आले. त्याचबरोबर महाल येथील जोहरीपुऱ्यातही अब्दुल हफीज शेखलाल यांचे अवैध बांधकाम तोडण्यात आले.फहीम खानच्या जामीन अर्जावर सरकारला नोटीस : नागपूर सत्र न्यायालयाने सोमवारी राज्य सरकारला नोटीस जारी करून फहीम खान याच्या जामीन अर्जावर १ एप्रिलपर्यंत उत्तर सादर करण्याचे निर्देश दिले. न्यायाधीश आर. जे. राय यांच्यासमक्ष सुनावणी झाली.

# विशेष ब्लॉकमुळे बडनेरा-नाशिक मेमू ट्रेन २६ मार्चपर्यंत केली रद्द

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील म्हसावद स्टेशनवर अप लूप लाइनचे ७९४ मी. करून ७५६ मी.पर्यंत विस्तारीकरण करण्यात येत आहे. तसेच गती वाढीकरणासाठी यार्डच्या पुनर्रचनेचे काम हाती घेण्यात आले आहे. परिणामी नॉन इंटरलॉकिंग कामे आणि ब्लॉक घेण्यात आला. त्यामुळे बडनेरा-नाशिक रोड, नाशिक रोड-बडनेरा मेमू ट्रेन रू मार्चपर्यंत रद्द केली आहे. विशेष म्हणजे मध्य रेल्वेने डिसेंबर २०२४ पासून हा तिसरा ब्लॉक घेतला असून, तिसऱ्यांदा काही दिवसांसाठी मेमू रद्द केल्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. प्रवाशांची गैरसोय होत आहे.



गाडी क्र. ०१२१२ नाशिक रोड ते बडनेरा व गाडी क्र. ०९२१९ बडनेरा ते नाशिक रोड या दोन्ही अप डाऊन मेमू गाड्या रद्द असल्यामुळे या मेमूने अकोला, शेगाव, भुसावळ येथे दररोज कामानिमित्त जाणाऱ्या सकाळी ११.०५ वाजता ही मेमू बडनेरा स्टेशनवरून निघते व रात्री ७.४० वाजता नाशिक रोड स्टेशनवर पोहोचते. त्याचप्रमाणे नाशिक रोड येथून ही मेमू दररोज रात्री ९.१५ वाजता निघून पहाटे ४.३५ वाजता बडनेरा येथे पोहोचते. संत नगरी शेगाव येथे जाण्यासाठी ही मेमू फारच उपयोगी आहे. त्यामुळे शेगावपर्यंत या मेमूत चांगलीच गर्दी असते. तसेच बसण्यास जागाही मिळते. तिकीटही फार जास्त नसल्याने मेमूने शेगाव, भुसावळपर्यंत जाण्यास प्राधान्य दिले जाते.

### प्रत्येक ब्लॉकचा मेमूला फटका

;प्रवाशांना त्रास सर्वसामान्य प्रवाशांसाठी उपयोगी ठरणाऱ्या बडनेरा-नाशिक रोड मेमू ट्रेनला प्रत्येक लहान, मोठ्या ब्लॉकचा फटका बसतो. सर्वप्रथम मेमूच रद्द केली जाते. त्यामुळे प्रवाशांना नाईलाजाने इतर पर्यायी वाहनांचा वापर करावा लागतो. डिसेंबरपासून मेमू ट्रेन तिस-यांदा रद्द केली आहे. बडनेरा स्टेशनवर प्लॅटफॉर्मचे काम सुरू असताना ती २० दिवस बंद होती. तसेच किमान तीन ते चार दिवस प्रत्येकी दोनदा बंद ठेवण्यात आली.

# शहिदांना अभिप्रेत भारत घडवण्यासाठी सज्ज व्हा- निरंजन टकले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५शिवणी रसुलापूर** देशात आज अराजकासारखी स्थिती आहे. २०१४ नंतर धर्मांध शक्तींना सुगीचे दिवस आले आहेत. आज देशाची सूत्रे अशा शक्तींच्या हाती आहेत, ज्यांचा देशाच्या स्वातंत्र लढाईत कोणताच सहभाग नव्हता. त्यामुळे शहिदांना अभिप्रेत असणारा भारत घडवण्यासाठी सज्ज व्हा, असे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार निरंजन टकले यांनी केले आहे.

ऑल इंडिया स्टुडंट्स फेडरेशन, ऑल इंडिया युथ फेडरेशन व भारतीय महिला फेडरेशन यांच्या वतीने शिवणी रसुलापूर येथे आयोजित शहीद दिन कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी एआयएसएफच्या राज्य सचिव प्रतीक्षा ढोके होत्या.




मार्गदर्शक म्हणून एआयएसएफच्या राष्ट्रीय उपाध्यक्ष संघमित्रा जेना, भाकपचे राष्ट्रीय कौन्सिल सदस्य तुकाराम भस्मे, जिल्हा सचिव सुनील मेटकर, तालुका सचिव संतोष सुरजुसे, महिला फेडरेशनच्या जिल्हा सचिव चित्रा वंजारी, भाकपचे शाखा सचिव लिलेश्वर आगळे, किसान सभेचे उमेश बनसोड, नौजवान सभेचे आकाश दादरवाडे, एआयएसएफचे यश वैद्य, सेवा सोसायटीचे अध्यक्ष शंकर बावनकुळे यांची उपस्थिती होती.

निरंजन टकले म्हणाले, की आज सर्वच समाज घटक या सरकारच्या जनविरोधी धोरणामुळे अडचणीत आले आहेत. शेतकरी, मजूर, कामगार, विद्यार्थी, युवक, महिला या सर्वांचे प्रश्न तीव्र झाले आहेत. अशावेळी शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरू यांना अभिप्रेत असलेला भारत घडवण्यासाठी तरुणांनी सज्ज व्हायलाच हवे. शिवणी रसुलापूर येथे दरवर्षी २३ मार्च या शहीद दिनी क्रांतिकारकांना अभिवादन करण्यात येते. या वर्षी २२ मार्चला रोगनिदान शिबिर घेऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर २३ मार्चला संध्याकाळी पत्रकार निरंजन टकले व एआयएसएफच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा संघमित्रा जेना यांचे व्याख्यान आयोजित केले होते.

या वेळी बोलतांना संघमित्रा जेना यांनी केंद्रातील आरएसएस प्रणित भाजप सरकारचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (एनईपी) म्हणजे सर्वसामान्य कष्टकरी जनतेला शिक्षण नाकारण्याचे षड्यंत्र असल्याचे सांगितले. त्यामुळे विद्यार्थी-युवकांनी भगतसिंगांच्या विचारातून प्रेरणा घेऊन आपल्या हक्कासाठी संघर्ष करण्याचे आवाहनही त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वेदिका मरगडेने केले. प्रास्ताविक राहुल चोपकर यांनी केले, तर आभार आर्यन वंजारी यांनी मानले.

कार्यक्रमासाठी विनोद तरेकर, माधव ढोके, अमोल राजकुळे, मोरेश्वर वंजारी, विनोद वैद्य, अनिल वैद्य, उमेश मंदुरकर, सोनाली वैद्य, सुनंदा ढोके, मनीषा कळंबे, प्रियंका बावनकुळे, रत्ना ढोके, प्रज्ज्वल ढोके, अंकुश वैद्य, उमेश बावनकुळे आदींनी प्रयत्न केले.

# सावंगा येथे गुढीपाडवा, रामनवमी यात्रा महोत्सव २९ मार्चपासून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५चांदूर रेल्वे** - जिल्ह्यात चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा विठोबा येथील श्री विठोबा संस्थान उर्फ श्रीकृष्ण अवधूत बुवा संस्थान येथे शनिवार, २९ मार्चला संस्थानचे वतीने सकाळी ७ ते १० पर्यंत मंदिर परिसर आणि ग्राम परिसराची साफसफाई, सायंकाळी ५ वाजता अमावास्येनिमित्त चंदन उटी आणि रमणा, रविवार, ३० मार्चला सायंकाळी ५ वाजता गुढीपाडव्यानिमित्त महाराजांचे झेंडे चढवण्याचा नेत्रदीपक सोहळा संस्थानचे विश्वस्त चरणदास कांडलकर, सावंगा विठोबा यांच्या हस्ते आणि विश्वस्त मंडळाच्या उपस्थितीत लाखो भाविकांच्या साक्षीने होणार आहे.

३१ मार्च ते ५ एप्रिल या कालावधीत संस्थानच्या वतीने दररोज अवधूत भजन, रात्री रमणा पालखी रथ आणि महाराजांच्या ओवीवर प्रवचन तसेच रक्तदान शिबिराचे - आयोजन केले आहे. ६ एप्रिलला दुपारी ४ वाजता रामनवमीनिमित्त चंदन उटी आणि रमणा, रात्री ८ वाजता प्रवचन कार्यक्रम, सोमवार, ७ एप्रिलला सकाळी




६.३० वाजता चैत्र मास मांडीच्या वाढव्यास अजौनी प्रारंभ, सकाळी ७ ते ९ या वेळेत मुख्य मंदिरातून धजन, रमणा, पालखी, रथासह शोभायात्रा तसेच ढालीचा आणि मांड वाढल्याचा कार्यक्रम, सकाळी ९ ते १० पर्यंत सत्कार समारंभ, सकाळी १० ते दु. १२ पर्यंत मांडीचे वाढव्याचा प्रक्चन कार्यक्रम, दुपारी १ वाजता भाविकांसाठी महाप्रसाद आयोजित केला आहे. भाविकांकडून दान साहित्य जमा करण्यासाठी संस्थानच्या वतीने गावात येणाऱ्या सर्व मार्गावर मंडप व्यवस्था, भाविक भक्त आणि मांडींना बसण्याकरिता मंडप, स्वयंसेवक निवास व्यवस्था तसेच भक्त निवास हॉलमध्ये भाविकांकरिता मसाले भात प्रसाद व्यवस्था करण्यात येत आहे.भाविकांनी सहकार्य करून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा

# लिंगभाव समानतेसाठी पुरुषांशी संवाद हवा लिंग समभाव सचेतना प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न

## ३० गावातील१०२ मित्रांना विविध मान्यवरांनी मार्गदर्शन

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५दर्यापूर-** महिला आर्थिक विकास महामंडळ अमरावती, (माविम) नव-तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्प जिजाऊ लोकसंचालित साधन केंद्र दर्यापूर यांच्या वतीने माननीय श्री सुनील सोसे (जिल्हा समन्वयक अधिकारी) यांच्या मार्गदर्शनाखाली लिंगभाव समानतेसाठी पुरुषांशी संवाद हवा लिंग समभाव सचेतना प्रशिक्षण कार्यशाळा घेण्यात आली या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण अंतर्गत तालुका विधी सेवा प्राधिकरण चे न्यायाधीश माननीय ओ एस पाटील सर व दर्यापूरचे जेष्ठ पत्रकार माननीय गजानन भाऊ देशमुख हे सुद्धा कार्यक्रमाला उपस्थित होते.



जिजाऊ लोकसंचालित साधन केंद्राच्या अध्यक्ष श्रीमती वैशालीताई चौधरी श्रीमती ललितताई रायबोले (सचिव) जयश्रीताई चव्हाण,(दर्यापूर विभाग),नगर परिषद च्या कार्यकारी अधिकारी माननीय खोरगडे मॅडम यांच्या हस्ते करण्यात आले प्रशिक्षणाला ३० गावामधून १०२ माविम मित्र मंडळाचे सदस्य उपस्थित होते कार्यशाळेतील संचालन वर्षाताई कावडकर व आभार प्रदर्शन शुभांगी ताई येवले यांनी केले सदर प्रशिक्षण कार्यशाळेला जिजाऊ लोकसंचालित साधन केंद्राचे व्यवस्थापक नीता खडे मॅडम लेखापाल रोशन सरदार सर सहयोगिनी भारती साखरे व उठझ उपस्थित होते या कार्यशाळेला प्रशिक्षक म्हणून लाभलेल्या माननीय सारिका ताई वानखडे मॅडम( सुखाय फाउंडेशन) यांनी पितृसत्ताक पद्धती, लिंग भेद सामाजिक पगडा, स्त्री आणि पुरुष यामधील फरक; दैनंदिन कामकाजा मधील फरक; तिला समाजात मिळणारी वागणूक. पूर्वापार चालत आलेली पद्धत आणि आता महिलांच्या कामकाजामध्ये झालेला बदल महिलांना शासनाने दिलेले संरक्षण यावर मार्गदर्शन केले तसेच माविंम मित्र मंडळ ची स्थापना कशी करण्यात आली यावर प्रशिक्षणार्थी कडून जाणून घेतले व प्रशिक्षणार्थी चे मनोगत जाणून घेतले.

# उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच कलिंगडाचे दर घसरले

## २० रुपये प्रतिकिलो दराने होतेय विक्री

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२५अमरावती-** उन्हाळा नुकताच सुरू झाला असून सर्वत्र थंडपेय आणि रसाळ फळांची मागणी वाढत आहे. यात लाल रंगाचे रसरशीत लालेलाल कलिंगडाचाही आस्वाद घेतला जातोय.

परंतु, यंदा कलिंगडाचे उत्पादन व आवक वाढल्याने बाजारात दर घसरले असून यापुढेही यात फारशी वाढ होणार नसल्याचा अंदाज व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे. यामुळे बाजारपेठेत आवक वाढलेल्या कलिंगडाची २० रुपये प्रतिकिलो दराने विक्री करावी लागत असल्याने उत्पादक बळीराजा मात्र चिंताग्रस्त झाला आहे.

मार्च महीन्याचा शेवटचा आठवडा सुरु असून दिवसा उन्हाचा तडाखा वाढला आहे. दुपारच्या वेळी घशाला कोरड पडते. अशात रसदार फळांचा आस्वाद घेण्याकडे नागरिकांचा कल असतो.

दरम्यान ठोक बाजारात मोठ्या प्रमाणात कलिंगड, खरबूज, द्राक्ष आदी फळे विक्रीसाठी दाखल झाले आहेत. सध्या फळांचे दरही सामान्यांच्या आवाक्यात आहेत. जानेवारीपासून टरबूज बजारात दाखल झाल्याने ग्राहकांकडून सातत्याने खरेदी सुरू आहे. दर्जा, चव उत्तम असल्याने ही फळे दर्यापूरकरांच्या पसंतीस उतरली आहेत. सध्या फळांचा राजा आंबा येण्याची प्रतीक्षा संपली आहे. काही दुकानांवर आंबा विक्रीस दिसून येत आहे. मात्र, कलिंगड मोठ्या प्रमाणात आठवड्यात दाखल झाले आहे.

मागील वर्षी कलिंगडाचे भाव सुरुवातीला ८० रुपये होते. यंदा मात्र, हंगामाच्या सुरुवातीपासूनच दर १५ ते २० रुपये किलो आहे. यामुळे येत्या काळात अजून दर कमी होतील की वाढतील ? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

गुरुवारच्या आठवडी बाजारासह दर्यापूरातील बसस्थानक चौक,रेल्वेगेट चौक,बुटी चौक,पेट्रोल पंप चौक,जयस्तंभ चौक,अकोट रोड बनोसा,बाभळी टी.पाईंट, अंजनगाव सुर्जी-अकोला



टी.पाईंटसह इतरत्र कलिंगड विक्रीस उपलब्ध आहेत.ग्राहकांकडूनही खरेदीला मोठा प्रतिसाद मिळत आहे.

विदर्भ प्रजासत्ताक

# शासकीय केंद्रांवरील तुरीची नोंदणी बंद

## तांत्रिक अडचणीमुळे शेकडो शेतकरी नोंदणीपासून वंचित : केवळ ७ हजार ९७८ शेतकऱ्यांची नोंदणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

हमीदराने शासकीय तूर खरेदीच्या नोंदणीसाठीची मुदत सोमवारी संपली असून आतापर्यंत जिल्ह्यातील ७हजार ९७८ शेतकऱ्यांची नोंदणी झाली आहे. यातील १ हजार ६२ शेतकऱ्यांची तूर खरेदी झाली असून साधारणतः १५ मेपर्यंत खरेदी करण्यात येणार आहे. जिल्ह्यासाठी ३९ हजार ६५४ टन खरेदीचे उद्दीष्ट देण्यात आले आहे. तांत्रिक अडचणीमुळे नोंदणीपासून अनेक शेतकरी वंचित राहले आहेत.



खुल्या बाजारात तुरीचे दर कमी असल्याने शेतकऱ्यांचा रोष कमी करण्यासाठी शासनाने हमीदराने शासकीय खरेदी सुरू केली आहे. तुरीला ७हजार ५५० रुपये हमीदर आहे तर खुल्या बाजारात ७,२०० ते ७,४०० रुपये दर मिळत आहे. सोमवारी स्थानिक बाजार समितीत ६६२३ पोते तूर आवक नोंदविण्यात आली. शासकीय केंद्रांवरील नियम व निकषांमुळे शेतकरी खुल्या चाजारात तूर आणू लागले आहेत. शासनाने विदर्भ मार्केटिंग व जिल्हा मार्केटिंग फेडरेशनची २१ केंद्रे सुरू केली आहेत. शासकीय खरेदीसाठी प्रती शेतकरी १३ क्विंटल तूर खरेदी करण्यात येत आहे. यासाठी २४ फेब्रुवारीपासून नोंदणी प्रारंभ करण्यात आली होती. त्याची मुदत २४ मार्चला संपुष्टात आली. यादरम्यान जिल्ह्यातील ७हजार ९७८ शेतकऱ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी १ हजार ६२ शेतकऱ्यांची तूर खरेदी करण्यात आली आहे. एकूण १४ हजार ५६१ क्विंटल तूर खरेदी करण्यात आली आहे. उर्वरित शेतकऱ्यांची तूर १५ मेपर्यंत खरेदी करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

# वैदर्भी महोत्सवात ४० उत्कृष्ट कर्मचारी, महिलांचा सन्मान

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अंगणवाडी सेविका तसचे उद्योगात भरारी घेणाऱ्या महिला उद्योग महिलांचा जिलाधिकारी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या महोत्सवात मराठी अभिनेत भारत गणेशपुरे यांच्या उपस्थिती चहाडी करितीं मैफील देखील रंगली यावेळी जिल्हाधिकारी यांनी महिलांना मागादर्शन केले



जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या प्रयवातून वैदर्भी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.खऱ्या अर्थाने ते कौतुकास्पद आहे यासारख्याजिल्हास्तरीय व विभागस्तरीय प्रदर्शनातूनच महिला बचत गटांनी तयार केलेला उत्पादित वस्तूंना खऱ्या अर्थाने बाजारपेठ निर्माण होत आहे, अशासारख्यावैदर्भी महोत्सवातूनच महिला सक्षमीकरणाचा पाया रचल्या जात असल्याची प्रतिपादन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले, 'जागर स्त्री शक्तीचा'या वैदर्भी महोत्सवाला अंतर्गत सोमवारी आयोजित कार्यक्रमांमध्ये जिल्हाधिकारी यांनी उपस्थिती दर्शवून महिला समूहांना प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख यांनी केले. २५ मार्च पर्यंत आयोजित या महोत्सवा अंतर्गत रवीवारी सिनेअभिनेता भारत गणेशपुरे यांच्या उपस्थितीत कवी संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बचतगटाच्या माध्यमातुन उद्योगजगतात भरारी घेणाऱ्या महीला व अंगणवाडी सेविका अशा ४० महिलांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

**अंगणवाडीतून बालकांना मिळणार इंग्रजीचे धडे**

जिल्हा परिषद जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुणवत्ता वाढीकरिता आता प्रयत्न सुरू झालेले आहे. सोबतच अंगणवाड्यात देखील गुणवत्ता धारक झाल्या पाहिजे याकरिता अंगणवाडीत इंग्रजी माध्यमांचे धडे दिल्या जाणार आहे. याकरिता अंगणवाडी सेविका, आशा व सर्व कर्मचाऱ्यांची मदत गरजेची असल्याचे जिल्हा परिषदेच्या सीईओ संजिता महापात्र यांनी सांगितले.

# रेशन दुकानदारांच्या प्रलंबित मागण्यांकरिता संपाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नांदगाव खंडेश्वर**

राज्यातील सुमारे ५५ हजार रास्तभाव धान्य दुकानदारांचे विविध प्रश्न अद्याप प्रलंबित आहेत. या प्रश्नांची सोडवणूक त्वरीत करण्यात यावी. अन्यथा मे महिन्यापासून ऑल महाराष्ट्र फेअरप्राईज शॉपकिपर्स फेडरेशनच्यावतीने संप पुकारण्यात येईल, असा इशारा जिल्हाध्यक्ष सुरेश ऊल्हे यांनी दिला आहे.



राज्यातील रेशन दुकानदारांकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. ई-केवायसी करण्यासाठी ३१ तारखेपर्यंत मुदत दिलेली आहे. मात्र, ई-पॉस मशीन नेहमी बंद असते. धान्य वेळेवर पोहचत नाही. धान्य पुरवठ्याची साखळी विस्कळीत झालेली आहे. धान्य दर महिन्याला १ ते ५ तारखेपर्यंत दिले गेल्यास त्याचे वाटप रेशनकार्डधारकांना करणे शक्य होणार आहे. त्याशिवाय, डिसेंबर महिन्यांपासून दुकानदारांना राज्य सरकारकडून कमीशनची रक्कम मिळालेली नाही. दुकानदारांना प्रति किलो धान्य वाटपामागे दीड रुपया अल्प कमीशन मिळते. जे दुकानदार त्यावर अवलंबून आहेत, त्यांना वीजबिल भरणे, कामगारांचा जिगार देणे तसेच स्वतःचा खर्च भागविणे मुश्किल होत आहे. या सर्व समस्यांची सोडवणूक न झाल्यास ऑल महाराष्ट्र फेअरप्राईज शॉपकिपर्स फेडेरेशनच्यावतीने दिशा ठरवून संप करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. असा इशारा यावेळी निवेदनातुन देण्यात आला.

# दापोरी येथे श्री संत लालदास बाबांच्या १०५ व्या भव्य पुण्यतिथी महोत्सवास सुरुवात

## ई. सन १९२० पासून लालदासबाबा यांच्या पुण्यतिथी महोत्सवाची परंपरा
## पुण्यतिथी महोत्सवानिमित्त उसळणार लाखो भक्तांचा जनसागर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५मोर्शी**

तालुक्यातील दापोरी या गावाला श्री संत लालदासबाबा यांनी आपली कर्मभूमी निवडून विशेष कार्य केले. त्यामुळे दापोरी या गावाला विशेष महत्व प्राप्त झाले आहे . श्री संत गजानन महाराज यांच्या समकालीन कालखंडात दापोरी येथे प्रगट झालेले श्री संत लालदास बाबा यांचा १०५ वा भव्य पुण्यतिथी महोत्सव कार्यक्रम दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुद्धा २५ मार्च ते १ एप्रिल या कालावधीत मोठ्या उत्साहात दापोरी नगरीत संपन्न होणार आहे. लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत लालदासबाबा यांचा पुण्यतिथी



महोत्सव साजरा कारण्याकरिता दापोरी नागरीमध्ये महाराष्ट्र, मध्यप्रदेश येथून व परिसरातील पंचक्रोशीतील लाखो भाविक सहभागी होत असून चैत्र शुद्ध चतुर्थीला लालदासबाबा यांच्या समाधीचा अभिषेक करून तिर्थस्थापणेने या महोत्सवाची सुरुवात करण्यात येत असून फाल्गुन कृष्ण द्वादशी पासून सुरु होणाऱ्या पुण्यतिथी महोत्सवात काकडा, आरती, भागवत प्रवचन, हरिपाठ, अखंड विना वादन, कीर्तन, आरती, भजन, यासह विविध कार्यक्रम व नवनवीन स्पर्धांचे उपक्रम राबविले जातात . दापोरी नगरीमध्ये लालदासबाबा बद्दल श्रद्धेची भावना असून या पावन भूमीत पुण्यतिथी महोत्सवाला येणाऱ्या लाखो भक्तांची प्रचंड वर्दळ असते .दापोरी येथे लाखो भक्तांचे श्रद्धास्थान असलेले श्री संत लालदास बाबा यांचा १०५ वा भव्य पुण्यतिथि महोत्सव दापोरी नगरीमध्ये सालाबादा प्रमाने यावर्षी मोठ्या उत्साहात साजरा होत असून या महोत्सवा निमित्य संगीतमय सदृश्यमय श्रीमद् भागवत कथा सप्ताह मोठ्या उत्साहात सुरु होणार असून ह भ प श्री स्वामी मुकुंद महाराज धोटे भागवताचार्य यांच्या मधुर वानीतून सुरु होणार आहे .या पुण्यतिथी माहोत्सवा निमित्य दापोरी येथे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून दापोरी नगरी मधे आनंदाचे व उत्साहचे वातावरण असून रोज हरिपाठ ,काकड़ा आरती , सत्संग , राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची प्रार्थना , खंजेरी भजन , अवधुति भजन , यासारखे विवध धार्मिक कार्यक्रम बाराही महिने सुरु राहत असून या भगवत सप्ताहाला रोज हजारो भक्तांचा प्रतिसाद मिळत असून दापोरी नगरीमधे १ एप्रिल रोजी श्री संत लालदासबाबा यांच्या पालखिचि भव्य शोभायात्रा मिरवणूक निघणार असून श्री संत लालदास बाबा यांच्या पुण्यतिथि महोत्सवाला लाखो भक्तांचा जनसागर उसळणार आहे . लालदास बाबा यांच्या पुण्यतिथी महोत्सवात मोठ्या संखेणे उपस्थित राहन्याचे आवाहन श्री संत लालदास बाबा संस्थान तर्फे करण्यात आले आहे.

# शेवटचे पाच दिवस : ३१ मार्च पर्यंत मालमत्ता कर भरल्यास नागरिकांना मिळणार २५% सुट


## मालमत्ता कर न भरल्यास मालमत्तांवर होणार जप्ती

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

महानगरपालिकेने मालमत्ता कर भरण्यासाठी नागरिकांना शेवटचे पाच दिवस म्हणजे ३१ मार्च पर्यंत शास्तीत २५% सुट दिली जाणार आहे. त्यानंतर कर न भरणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी मनपा प्रशासनाने तयारी सुरू केली आहे. पहिल्या टप्प्यात संबंधित व्यावसायिकांच्या कार्यालयातील, कारखान्यातील सामान जप्त करण्यात येईल. तर दुस-या टप्प्यात त्या सामानाचा लिलाव करण्यात येईल. त्यामुळे करवसुलीसाठी महापालिकेचे जोरदार प्रयत्न सुरू आहेत. करसंकलन विभागाकडून शहरातील मालमत्ताधारकांना विविध माध्यमातून कर भरण्याचे आवाहन करण्यात आले.

मात्र, अनेक बड्या थकबाकीदारांनी, व्यावसायिक आस्थापनांनी, गृहनिर्माण क्षेत्रातील विकासकांनी मोठ्या प्रमाणावर मालमत्ता कर थकवला असून त्यांनी कराचा भरणा करावा, यासाठी महापालिका टॉप-१० थकबाकीदारांची यादी प्रसिद्ध करत आहे.

थकबाकीदारांकडून करवसुली झाल्यास मालमत्ता करवसुलीचे लक्ष गाठण्यात महापालिकेला मोठा हातभार लागेल. परंतु, तसे होताना दिसत नाही. नागरिकांना शास्तीत २५% सुट दिली जाणार असून कर भरण्याची अंतिम मुदत ३१ मार्च आहे. अशा थकबाकीदारांना बिलासोबतच जप्तीपूर्व नोटीस सुध्दा बजाविण्यात आल्या आहेत. मालमत्ताधारकांनी जागरुकपणे कर भरुन शास्तीच्या २५ टक्के सवलतींचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.



करसंकलन विभागाकडून थकबाकी असणाऱ्या थकबाकीदारांच्या मालमत्तांचे जप्ती अधिपत्र काढण्यात आले असून अशा मालमत्तांवर जप्तीची कारवाई करण्यासाठी जप्ती मोहीम सुरु करण्यात आली आहे. त्यासोबतच, फक्त चालू वर्षाचा मालमत्ता कर ३१ मार्च अखेर न भरणाऱ्या मालमत्ताधारकांच्या मालमत्ता देखील थकबाकीदारांच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येणार असून सदर मालमत्तासुध्दा मालमत्ता जप्तीस पात्र होणार आहेत.

महानगरपालिकेच्या हद्दीतील मालमत्ताधारकांमध्ये नियमितपणे कर भरणाऱ्या करदात्यांनी कायमच करसंकलनामध्ये मोलाचा वाटा उचलला आहे. परंतू अद्यापही ज्या मालमत्ताधारकांनी कराचा भरणा केला नाही अशा मालमत्ताधारकांनी ३१ मार्च रोजीपर्यंत आपल्या कराचा भरणा करुन वाढणारे २ टक्क्यांचे विलंब शुल्क व मालमत्ता जप्तीची कारवाई टाळून शहराच्या विकासामध्ये हातभार लावावा असे आवाहन महानगरपालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांनी केले आहे.

# सोलापूर विद्यापीठ आयोजित प्रेरणा शिबिरात अमरावती विद्यापीठ ठरले सर्वोत्कृष्ट

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर येथे १७ ते २१ मार्च दरम्यान पार पडलेल्या राष्ट्रीय सेवा योजना शिबीरात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या जय उकरडे, तन्मय देव, समर्थ पाठक, गौरव यशकर, प्रणवदीवे, आशु भुजबळ, पुनम पली, पाली ठाकरे, मानसी आसटकर, श्रेया गायगोले या दहा विद्याथ्र्य डॉ. अनिता धुर्वे सर्वोत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी म्हणून निवडण्यात आले.



प्रेरणा शिबीर हे राष्ट्रीय सेवाभावी स्वयंसेवकांसाठी एक विशेष शिबीर असते, ज्यात विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याचे काम केले जाते. विविध उपक्रम घेतले जातात, विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होऊ शकतो. सांस्कृतिक कार्यक्रम, श्रमदान आणि इतर सर्वांगीण बाबींचा विचार अमरावती विद्यापीठाच्या चमुला सर्वोत्कृष्ट विद्यापीठ म्हणून गौर करण्यासाठी आले. तसेच डॉ. अनिता धुर्वे यांना सर्वोत्कृष्ट महिला कार्यक्रम अधिकारी म्हणून पुरस्कृत करण्यात आले. तर कु. दिपाली ठाकरे हिला सर्वोत्कृष्ट कविता वाचन, उत्कृष्ट अशा चार पुरस्काराने गौरवण्यात आले. या सर्व चमूंचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, राष्ट्रीय सेवा योजना संचालक, डॉ. निलेश कडू यांनी अभिनंदन केले आहे.

# विदर्भातील सिंचन प्रकल्प रखडले मुख्य सचिव हायकोर्टाच्या रडारवर

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५नागपूर**

विदर्भातील अनेक सिंचन प्रकल्प रखडले असून, हे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी काय केले जात आहे, याची समाधानकारक माहिती राज्याच्या मुख्य सचिवांनी गेल्या दोन वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठामध्ये सादर केली नाही. त्यामुळे न्यायालयाने सोमवारी नाराजी व्यक्त करून यासंदर्भात येत्या तीन आठवड्यांत सर्वसमावेशक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचा आदेश मुख्य सचिवांना दिला. तसेच, यावेळी टाळाटाळ केल्यास अवमान कारवाई करण्यात येईल, अशी तंबी दिली.

विदर्भातील रखडलेले सिंचन प्रकल्प तातडीने पूर्ण व्हावे, यासाठी लोकनायक बापूजी अणे स्मारक समितीने जनहित याचिका दाखल केली आहे. त्यावर न्यायमूर्तीद्वय नितीन सांबरे व वृषाली जोशी यांच्यासमक्ष सुनावणी झाली. रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्ण होण्यासाठी सामान्य प्रशासन, नगर विकास, महसूल व वने आणि पाटबंधारे विभाग यांनी एकमेकांसोबत समन्वय ठेवून कारवाई करणे गरजेचे आहे.

# डॉ. अनिल सावरकर यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करा : ना. नितिन गडकरी यांच्याकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२५अमरावती**

स्थानिक श्री. संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटल व रिसर्च इन्स्टिट्यूटचे अध्यक्ष डॉ. अनिल सावरकर यांना 'पद्मश्री' पुरस्काराने सन्मानित करण्यात यावे, अशी मागणी उपेक्षित समाज महासंघ व विविध सेवाभावी संस्था आणि राजकीय पक्षाच्या नेत्यांनी केंद्रिय मंत्री ना. नितिन गडकरी यांना एका निवेदनाद्वारे केली. श्री. संत



अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलच्या नविन इमारत व कार्डियाक कॅथ लॅबच्या उद्घाटनाप्रंसगी ना. नितीन गडकरींना सदरचे निवेदन देण्यात आले.श्री. संत अच्युत महाराज यांच्या आध्यात्मिक व मानवतावादी विचारापासून प्रेरणा घेऊन गेल्या ५० वर्षापासून सामाजिक सेवाकार्यात व रुग्णांच्या जीवनात आनंदाची साखर पेरण्यासाठी डॉ. अनिल सावरकर यांनी स्वतःला झोकुन दिले आहे. आरोग्यं परमं भाग्यं स्वाथ । सर्वार्थसाधनम् ह्या न्यायाने समाजातील दुर्बल, गोरगरीब, जनतेला हृदयरोग व जन्मजात हृदयरोगापासून मुक्तता मिळावी म्हणून डॉ. अनिल सावरकर यांचे सेवाकार्य हे सर्वांना प्रेरणा देणारे आहे. त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित केल्यास एका सच्चा समाजसेवकाला न्याय दिल्यासारखे होईल, असे निवेदनात म्हटले आहे.निवेदन देताना उपेक्षित महासंघाचे अध्यक्ष प्रा. श्रीकृष्ण बनसोड, माजी लेडी गव्हर्नर प्राचार्य डॉ. कमलताई गवई, माजी मंत्री जगदिश गुप्ता, माजी महापौर विलास इंगोले, पुष्पाताई बोंडे, विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनचे अध्यक्ष डॉ. सुभाष गवई, सहकार नेते राजेंद्र महल्ले, म. फुले बँकेचे राजेंद्र आंडे, श्रीकृष्ण माहोरे, मावळा संघटनेचे इंजि. सुभाष गोहत्रे, सर्वशाखीय माळी ऋणानुबंधचे सुधिर घुमटकर, सुरेश रतावा, संजय नागरे, पोलीस पाटील कविता नरेंद्र पाचघरे आदींसह अनेकांची उपस्थिती होती.

# अमरावती जिल्हा परिषदचे २८ विद्यार्थी व ४ शिक्षक दिल्ली शैक्षणिक सहली करीता रवाना

## मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांनी दाखवली हिरवी झेंडी







**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

जि.प.अमरावती मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अभिनव संकल्पनेतून प्रज्ञावंत विद्यार्थ्यांचा दिल्ली येथे शैक्षणिक सहल दौरा २५ मार्च ते २८ मार्च या चार दिवसकरिता नियोजित केली होती.या करीता अमरावती जिल्हा परिषद शाळेमधिल २८विद्यार्थी व चार शिक्षकांची निवड करण्यात आली.आज सकाळी प्राथमिक शिक्षणाधिकारी कार्यालय अमरावती येथुन सहली करीता रवाना करण्यात आले.या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापाञा,प्राथमिक शिक्षणाधिकारी डॉ.अरविंद मोहीरे,उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने,दिपक कोकतरे,शिक्षण विस्तार अधिकारी मोहम्मद असफाक यांनी हिरवी झेंडी दाखवून आणि सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांचे स्वागत करुन या शैक्षणिक सहली करीता रवाना करण्यात आले.यावेळी विद्यार्थांचे पालक,वर्ग शिक्षक, मुख्याध्यापक, गटशिक्षणाधिकारी उपस्थित होते. या शैक्षणिक सहली करीता चौदा तालुक्या मधुन प्रज्ञावंत विद्यार्थ्याची निवड करण्यात आली होती. सहलीकरिता विद्यार्थी रेल्वेने व विमानाने प्रवास करणार असून दिल्ली येथे राष्ट्रपती भवन,संग्रहालय, इंदिरा गांधी स्मारक,राजघाट,इंडिया गेट, दिल्ली मधिल आदर्श शाळा,अक्षरधाम मंदिर,लोटस मंदिर,लाल किल्ला,कुतुबमिनार ला भेट देणार आहेत या मध्ये सहभागी विद्यार्थी व शिक्षक यांना संपूर्ण खर्च अमरावती जिल्हा परिषद करीत आहे तसेच सर्वांचा विमा सुध्दा शिक्षण विभागाने काढला आहे.या शैक्षणिक सहली करीतासांस्क्रुती उमेश कडू कु. देवयानी गजानन देशमुख पियुश नंदू हिव्रले कु. मयुरी अमोल बोरेकर यासिर अहमद खान जावेद खान उम्मे कुलसम मोह. इम्रान कु. चंचल अनिल शिंदे अर्णव नितीन मेहरे शेख बिलाल शेख आरिफ ह्म्रान शेख मोहिब अथार कु. छरपपपींपरींळ सुरेश गावई मनस रुपर बदकेरे मयूर मनोहर खडक प्रजावल सुनील तायडे कु. अदिती चेतन चाव्हान आयुष मंगेश काल्दाटे कु. देवश्री मोहन हराले कु. प्राजक्त संतोष तिमरि कु. वैष्णवी हरीचंद जारकर सरथाखरिदास कांताले लायबा तस्निस मोहम्मद. अश्थ शरद वैद्य अरहम सलीम मिर्झा कु. गुंजन निलेश अम्ले कु. एकता अमार्डीप कोंडेकर कु. अनुष्का दिपक युवनेट कु. भविका मारोती पचेरे सहभागी शिक्षक . वीरेंद्र ॲडनानिंग ब्राह्मण, आशिष काच्चुलजी पांडे, कु. भारती सुनील कासे कु. सुनिता शालिग्रामजी लाहणे यांचा समावेश आहे.

# घरात ठेवले तर सडते, विकायचे तर रडवते

## शेतकऱ्यांमध्ये चिंता व्यक्त : कांद्याची आवक वाढताच भाव गडगडले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५ अमरावती**

काही दिवसांपूर्वी कांदा आणि लसूणला चांगला भाव मिळत होता. परंतु, नजीकच्या काळात नवीन कांदा आणि लसूण निघाल्याने बाजारात आवक वाढली. त्यामुळे भावही कोसळले आहे. कांदा पिकवून चांगले पैसे मिळतील, या आशेवर असणाऱ्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या पदरी निराशा आल्याचे बघायला मिळत आहे.

महागडे रोप, खते विकत आणून शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली. बेड व वाफे पद्धतीवर पीक घेण्यासाठी मोठा खर्च करण्यात आला. मोठ्या उमेदीने कांद्याची लागवड करण्यात आली. तसे पाहिले तर कांद्याच्या भावात नेहमी चढउतार येत असतात. तेजीच्या काळात ज्यांचा कांदा निघतो, त्यांच्या गाठीशी चार पैसे उरतात. परंतु, मंदीच्या काळात आलेला कांदा शेतकऱ्यांचे आर्थिक गणित बिघडवून जातो. कारण मंदीच्या काळात कांदा साठवून ठेवतो म्हटले तर यावर मोठा खर्च करावा लागतो. दुसरीकडे भाव वाढेल की नाही, याचाही नेम नसतो. सध्या कांद्याला १० ते १५ रुपयांच्या दरम्यान भाव मिळत आहे.भाजीमंडीत मिळणाऱ्या दरातच आज विविध ठिकाणी रस्त्यावर दुकान थाटून बसणाऱ्या विक्रेत्यांकडूनही सारख्याच दरात कांदा उपलब्ध होत आहे. शेतकरीही वाहनांमध्ये कांदा भरून आणत दुकान लावून विक्री करत असल्याचे दिसून येते.कांदा पीक घेण्यासाठी मोठा खर्च करावा लागतो. यासाठी लागणारे इंधन, मजुरी आणि मशागत खर्चात दुपटीने वाढ झाली आहे. दुसरीकडे मात्र कांद्याच्या किमतीत मंदी आली आहे.



### ढीग करून ठेवल्यास कांद्याचा खराबा

कांदा साठवून ठेवण्यासाठी तांत्रिक पद्धतीचा वापर करावा लागतो. त्याला वरचेवर सोलावे लागते. खराब कांदा काढून फेकावा लागतो. सडलेल्या कांद्याचा वास येत असल्यामुळे दीर्घकाळ साठवून ठेवणेही शक्य नाही.

### खते, औषधीचा खर्च जिवाच्या वर

कांदा लागवडीनंतर या पिकांना नियमित विविध प्रकारची महागडी खते द्यावी लागतात. औषधांची फवारणी करावी लागतात. या खर्चातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

# धामणगाव रेल्वे येथील स्टोन क्रशरचे दिवानजीला चाकुचा थाक दाखवुन लुटणारी कुख्यात टोळी अटकेत

## मजुरांच्या चुकाऱ्याचे २ लाख ८८ हजार रुपये होते लुटले ; आरोपींकडून २ लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २५ धामणगाव रेल्वे**

चाकूचा धाक दाखवून स्टोन क्रशरच्या दिवानजीच्या जवळील तीन लाख रुपयांची रक्कम लुटली.दिवानजीची दुचाकी,दोन स्मार्ट मोबाईल घेवून धूम ठोकल्याचीच घटना ९ मार्चला सकाळी ८ वाजताच्या सुमारास घडली होती.दरम्यान स्थानिक गुन्हे शाखेकडुन तिन आरोपींना ताब्यात घेवून विचारपुस केली त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून २ लाख १५ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.



निलेश शेषराव चाफले (४५) रा.श्री स्वामी समर्थ नगर, जुना धामणगाव हे साई स्टोन क्रेशर येथे दिवानजी म्हणून गेल्या पाच वर्षांपासून काम पाहत आहे.९ मार्चला सकाळी ७.४५ वाजता साई स्टोन क्रेशर येथे मजुराचा पगार असल्याने हे घरुन रामगाव रोडने दुचाकी क्र.एम.एच.२७- एझेड ८०३० ने हिरव्या रंगाच्या कापडी पिशवीमध्ये २ लाख ८८ हजार रुपये,हिशोबाचे चार रजिस्टर असलेली बॅग घेवुन साई स्टोन क्रेशर रामगाव येथे निघाले असता अंदाजे ८ वाजताच्या सुमारास रामगाव रस्त्याने जात असता बाळासाहेब तुपसुंदरे यांचे शेताजवळ एका पेंशन प्रो काळ्या रंगाचे मोटर सायकलवर दोन ईसम मागे येवुन त्यांची मोटर सायकल निलेश चाफले गाडीचे समोर आडवी लावली.त्या मोटर सायकलवर असलेल्या दोन इसमापैकी एका इसमांनी त्यांचे मोटर सायकलवरुन उतरुन मला चाकुचा धाक दाखवुन हिरव्या रंगाच्या कापडी पिशवी मधील २ लाख ८८ हजार रुपये,हिशोबाचे चार रजिस्टर असलेली बॅग जबरीने हिसकावुन घेवून ढकलुन दिले.त्यामुळे निलेश चाफले खाली पडले व त्यांनी आरडाओरडा केली असता तेथील बाजुच्या शेतात काम करीत असलेला राहुल गौतम बन्सोड रा.रामगाव हे धावत आला तेव्हा त्या दोघांनी त्यांची दुचाकी व निलेश चाफले यांची दुचाकी घेवुन पळुन गेले. त्या नंतर निलेश चाफले यांनी राहुल गौतम बन्सोड यांच्या दुचाकीने त्या दोघांचे पाठीमागे गेले असता तर निलेश चाफले यांची दुचाकी तेथुन थोडया अंतरावर रामगाव ते धामणगाव रोडवर स्मशान भुमी जवळ मोटरसायकल टाकुन दिलेली दिसली. व ते दोन्ही इसम त्यांचे मोटर सायकलवर बसुन धामणगाव रेल्वे कडे पळुन गेले.२ लाख ८८ हजार रोख रक्कम,१४ हजार रुपयांचे दोन मोबाईल असा एकंदरीत ३ लाख २ दोन हजार रुपयांचा ऐवज बळजबरीने हिसकावुन नेला होता.

चांदुर रेल्वे उपविभागात रेकॉर्डवरील शोध करीत असतांना गोपनिय बातमीदारामार्फत खबर मिळाली की, नागपुर ग्रामीण पोलीसांच्या रेकॉर्डवरील आरोपी कृष्णा पंचेश्वर रा. जरीपटका, नागपुर याने त्याचे साथीदारासह सदरचा गुन्हा केला असल्याची माहिती मिळाली.यावरून पोलीस उपनिरीक्षक मोहम्मद तस्लीम यांचे पथकाने जरीपटका, नागपुर येथुन कृष्णा तिवड्डु पंचेश्वर वय २८ वर्ष, रा. घर नं. १८, श्रमीक नगर, परसोडी, वर्धा रोड, नागपुर याला ताब्यात घेवून गुन्हयासंबंधाने विचारपुस करताच त्याने खुशाल थुल रा. गडडी गोदाम, नागपुर व शैलेश राठोड रा. रामगाव ता. धामणगाव रे. जि. अमरावती याचे मदतीने सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. नागपुर येथील पो.स्टे. एम.आय.डी.सी. येथील जबरी चोरीचे गुन्हयात सन २०२३ मध्ये नागपुर जेलमध्ये असतांना कृष्णाची भेट बलात्काराचे गुन्ह्यात जेलमध्ये असलेल्या शैलेश राठोड याचे सोबत झाली. तेव्हा त्यांनी ऐकमेकांचे मोबाईल घेतले. जेलमधुन सुटल्यावर कृष्णा व त्याचा मित्र खुशाल यांना पैशाची गरज असल्याने शैलेश राठोड रा. रामगाव याचे कडुन टिप प्राप्त केली व त्यानुसार त्यांनी कोंढाळी येथुन पेंशन कंपनीची दुचाकी गाडी चोरुन साई स्टोन क्रशर वरील दिवानजी याला चाकूचा धाक दाखवून लुटले व चोरी केलेले पैसे आपसात वाटुन घेतले असल्याचे सांगीतले. तिन्ही आरोपींना ताब्यात घेवून विचारपुस केली त्यांनी गुन्हयाची कबुली दिली.मुख्य आरोपी कृष्णा पंचेश्वर रा. श्रमीक नगर, नागपुर यांचे ताब्यातुन पो.स्टे. कोंढाळी नागपुर येथुन चोरी गेलेली व गुन्हयात वापरलेली पेंशन प्रो. कंपनीची मो.सा. एम.एच. ३१डि.वाय.२३१३ किंमत अंदाजे ७० हजार रुपये व एक मोबाईल किंमत अंदाजे १० हजार रुपये, खुशाल थूल रा. गडडी गोदाम, नागपुर याचे ताब्यातून गुन्हा करण्यासाठी वापरलेली एक के.टी.एम. मो.सा. क्र. एम.एच. ३१एफ.एम.१२३४ किंमत अंदाजे १ लाख २५ हजार रुपये व शैलेश राठोड रा. रामगाव याचे ताब्यातून एक मोबाईल किंमत अंदाजे १० हजार रुपये असा एकुण २ लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद आरोपीतांन कडुन धामणगाव व कोंढाळी येथील दुचाकी चोरीच्या गुन्हयाची उकल करण्यात आली असुन त्यांना पुढील कार्यवाही करीता पोलीस ठाणे दत्तापुर यांचे ताब्यात देण्यात आले आहे.

# नागरवाडी गावाला जिल्ह्यातील पहिले 'सौरग्राम' चा बहुमान

## मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि बापूसाहेब देशमुख यांच्याहस्ते लोकार्पण : जिल्ह्यातील पहिले आणि विदर्भातील दुसरे सौरग्राम





**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५अमरावती**

प्रधानमंत्री सुर्यघर मोफत वीज योजनेचा लाभ घेत जिल्ह्यातील पहिले सौरग्रामहोण्याचा बहुमान चांदुरबाजार तालुक्यातील नागरवाडी गावाला मिळाला असून छतावर सौर प्रकल्प बसवून वीज निर्मितीला सुरूवात केल्यामुळे पुढील काळातील गावाचे विजेचे बिल शुन्य होणार असल्याचे प्रतिपादन मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी यांनी केले.

स्वतंत्र गावाचा दर्जा असलेले संत श्री गाडगे महाराज संस्थान व आश्रम शाळा नागरवाडी गावातील सर्व वीज जोडण्या सौर प्रकल्पाला जोडल्यामुळे नागरवाडी हे पहिले सौरग्राम ठरले आहे. यावेळी या संस्थानचे संस्थापक बापूसाहेब देशमुख,अधीक्षक अभियंता दीपक देवहाते,कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट, उपकार्यकारी अभियंता दिनेश भागवत यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता श्री कुलकर्णी म्हणाले की,नागरवाडी गावाने पुढाकार घेत छतावरील सौर प्रकल्पाच्या माध्यमातून वापरासाठी लागणारी वीज स्वत: निर्माण करण्याला सुरूवात केली आहे. जिल्ह्यातील इतर गावांनीही नागरवाडी गावाचा आदर्श घेत प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेचा लाभ घेत आपल्या छतावर सौर प्रकल्प बसवून वीजनिर्मिती करण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यकारी अभियंता विजय कुमार कासट म्हणाले की , नागरवाडी गाव हे सौरग्राम म्हणून उदयास आलेले वर्धा जिल्यातील चिचघाट नंतर विदर्भातील दुसरे गाव आहे.यासाठी बापूसाहेब यांचा पुढाकार आणि मोलाचे सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगीतले.चांदूर बाजार पासून २० किमी अंतरावर असणारे संत श्री गाडगे महाराज संस्थान नागरवाडी या गावाला स्वतंत्र गावाचा दर्जा आहे. आश्रम शाळा,वस्तीगृह आणि एकुण १० शिक्षक सदनिकाचा यात समावेश आहे. प्रधानमंत्री सुर्यघर मोफत योजनेतील प्रति किलोवॅट ३० हजार रूपये अनुदानाचा लाभ घेत याठिकाणी १० शिक्षक सदनिकेच्या छतावर प्रति १ किलोवॅटचे सौर प्रकल्प बसविण्यात आले.त्याचबरोबर संस्थेसाठी ७.५ किलोवॅटचे स्वतंत्र सौर प्रकल्प (विना अनुदान)बसविण्यात आले आहे.त्यामुळे एकून १७.५ किलोवॅटची सौर यंत्रणा बसविण्यात आल्यामुळे महिन्याला सरासरी २००० हजार युनिटची वीज निर्मिती होणार आहे व वीज देयकात तेवढीच बचत होणार आहे.

मुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तसेच ऊर्जा सचिव आभा शुक्ला आणि महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र,संचालक (संचालन) अरविंद भादीकर, संचालक (प्रकल्प) प्रसाद रेशमे,प्रादेशिक संचालक, नागपूर परेश भागवत, कार्यकारी संचालक (विशेष प्रकल्प) धनंजय औंढेकर यांच्या पुढाकाराने प्रत्येक जिल्ह्यातील किमान दोन गावे ही शंभर टक्के सौरग्राम करण्याचे नियोजन आहे.

नागरवाडीला सौरग्रामचा बहुमान मिळवून देण्यासाठी मुख्य अभियंता ज्ञानेश कुलकर्णी आणि अधीक्षक अभियंता दीपक देवहाते यांच्या मार्गदर्शनात कार्यकारी अभियंता विजयकुमार कासट उपकार्यकारी अभियंता दिनेश भागवत,सहाय्यक अभियंते प्रसाद पांडे आणि चंद्रशेखर कुंभारकर यांनी मोलाची भूमिका पार पाडली.

# कापसाने भरलेल्या गाडीने घेतला पेट

## रस्त्याकडेच्या बाजूला धुरे पेटलेले असल्याने घडली घटना

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५दर्यापूर**

दर्यापूर तालुक्यातील रुस्तमपूर येथील शेतकरी श्री गणेश रामभाऊ लोडम यांच्या घरून ७० ते ८० क्विंटल कापूस भरून गाडी दर्यापूर कडे निघाले असता गोळेगाव फाट्याच्या जवळ रोडच्या बाजूला धुऱ्याला पेटवून दिल्याने सर्वत्र दूर झाला होता व त्या आगीच्या लपेट्यात गाडी आली व गाडीने पेट घेतला.




ही बाब मिनिट्रक चालक रणजीत ढोके राहणार सांगळूद यांच्या लक्षात आलीअसता त्यांनी गाडी उभी करून दिली. या वेळी या मिनी ट्रक मध्ये सात ते आठ हमाल होते व गाई कापसाने भरलेली होती . आग लागल्याच्या घटनेची माहिती दर्यापूर नगरपरिषद ला राजू भाऊ सोमानी यांनी फोन लावून दिली यावेळी अग्निशामक दलाची गाडी घटनास्थळी पोहचली व आग काटो आटोक्यात आली मात्र गाडीचा इंजिन पूर्णतः जळून खाक झाले व त्याचबरोबर बरासचा कापूस अंदाजे जवळजवळ दहा ते १२ क्विंटल कापूस हा जळून गेल्याचा प्राथमिक अंदाज आहे महसूल विभागाचे व दर्यापूर पोलीस स्टेशन यांनी येऊन पंचनामा केला गाडी मालक म्हणून विलास पाटील डोळे यांच्या मालकीची असून गाडीचे इंजिन मात्र पूर्णपणे जळून खाक झालेले आहे.

# नवनिर्वाचित आ.संजय खोडके यांचा सत्कार

## नांदगाव पेठ सोबत कायम आहेत ऋणानुबंध

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२५नांदगाव पेठ**

विधान परिषदेचे नवनिर्वाचित आ. संजय खोडके यांच्या अमरावती आगमनानंतर नांदगाव पेठ येथील सामाजिक कार्यकर्त्यांच्या वतीने नुकताच आ. खोडके यांच्या निवासस्थानी जाऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. संजय खोडकेयांचे नांदगाव पेठ शी जुने ऋणानुबंध असून गावाच्या विकासात्मक बाबींमध्ये अनेक वेळा खोडके दाम्पत्याचा सहभाग राहलेला आहे हे विशेष! या प्रसंगी मोनुसिंह राठोड, उदयसिंह चंदेल, बलवीर चौहान, गणेश सोनोने आदी मान्यवरांनी संजय खोडके यांची भेट घेऊन उभयतांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी आमदार संजय खोडके यांच्या पुढील कार्यकाळासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या तसेच त्यांच्या सामाजिक व विकासात्मक कार्याची प्रशंसा करण्यात आली.आ.संजय खोडके यांनीही आपल्या भूमिकेबाबत उपस्थितांना विश्वास दिला आणि लोकहितासाठी सदैव कार्यरत राहण्याचे आश्वासन दिले.

